ब्रह्मतेजो बलंबलम्



हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे
मुखपत्र

स्थापना : १९६४

६२

# मासिक नवस्नेह



वर्ष १२ वे : अंक ७ ▪ ऑक्टोबर २०२६ किंमत : 20 रु.



प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**
४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan



# श्रीमहालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा

## आमंत्रण आपुलकीचे !

प्रतिवर्षाप्रमाणे आपल्या संस्थेतर्फे याही वर्षी श्रीमहालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी ब्राह्मण सभा, करवीर-मंगलधाम, बिनखांबी गणेश मंदिर जवळ, कोल्हापूर येथे संपन्न होणार आहे.

कार्यक्रम सकाळी ९ ते रात्री १० वाजेपर्यंत असतील. यामध्ये पूजा, श्रींची कहाणी वाचन, आरती, महानैवेद्य, श्री देवी मूर्ती प्रतिष्ठापना व दर्शन, मंत्रपठण, घागरी फुंकणे असा नियोजित कार्यक्रम होणार आहे. अष्टमी पूजनासाठी वशेळ्यांनी आगाऊ नाव नोंदणी करावी, ही विनंती.

### ❊ कार्यक्रम ❊

| | |
|---|---|
| सकाळी ९ वा. | स्वागत, नोंदणी आणि पूजासाहित्याचे वाटप |
| स. १० वा. | तुलसी पूजन व श्रींचे पूजेचा आरंभ, संकल्प |
| स. ११ ते १२ | आरती, श्रींच्या कहाणीचे वाचन, महानैवेद्य |
| द. १२ ते २.३० | महाप्रसाद |
| साय. ७ वा. | श्रींची मूर्ती उभी करणे, पूजा, आरती, मंत्रपठण, नैवेद्य |
| साय. ७.१५ वा. | श्रींचे दर्शन सर्वांसाठी खुले व घागरी फुंकणे, पारंपरिक गीते इ. |

या कार्यक्रमासाठी सर्व पोटशाखेतील ज्ञाती बांधवांनी उपस्थित राहून सेवेचा तसेच महाप्रसादाचा लाभ घ्यावा, ही विनंती.

आपले स्नहांकित,

मकरंद करंदीकर (अध्यक्ष) प्रसाद भिडे (उपाध्यक्ष)

केदार जोशी (कार्यवाह)

आणि सर्व संचालक मंडळ सदस्य

## अभिनंदनीय निवड !





नुकत्याच झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेनंतर कोल्हापूर चित्पावन संघाच्या नव्या कार्यकारी मंडळाची निवड झाली असून अध्यक्षपदी श्री. मकरंद विष्णु करंदीकर व उपाध्यक्षपदी श्री. प्रसाद प्रभाकर भिडे यांची निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल त्यांचे आणि संघाच्या नवनिर्वाचित संचालकांचे सभासदांकडून आणि हितचिंतकांकडून हार्दिक अभिनंदन !

## श्री महालक्ष्मी अष्टमी जागर सोहळा घरपोच प्रसाद योजना

आपल्या संघाच्या वतीने रविवार, दि. १८ ऑक्टोबर २०२६ रोजी दाते पंचांगानुसार अष्टमी जागर सोहळा आयोजित केला आहे. सध्याच्या परिस्थितीत अनेक भाविकांना दर्शनासाठी येणे शक्य होत नाही. विशेषत: घरातील ज्येष्ठ मंडळी, लहान मुले, गर्भवती महिला आदि कुटुंब सदस्य इच्छा असूनही येऊ शकत नाहीत. त्यासाठी संघाच्या वतीने श्रींचा प्रसाद आपल्या घरी पोहोचवण्याचा संकल्प केला आहे. यामध्ये हळद-कुंकू, फुटाणे, सुक्या मेव्याचा प्रसाद आणि सुरक्षित पिशवी यांचा समावेश आहे. आपल्या कुटुंबाच्या कल्याणासाठी देवीपुढे संकल्प केला जाईल. यासाठी आपण १५ ऑक्टोबर, २०२६ पर्यंत नोंदणी केल्यास प्रसाद आपल्या घरी १८ ऑक्टोबर, २०२६ पासून ४-५ दिवसांत कुरिअरने घरपोच पाठवला जाईल. याकरिता एका प्रसादासाठी देणगी शुल्क केवळ रु. ३५१/- देण्याची विनंती करीत आहोत. आपण (१) ज्यांच्या नावे प्रसाद घरपोच हवा असेल त्याचे संपूर्ण नाव, पत्ता व व्हॉट्सअप नंबर आणि (२) गोत्र आणि प्रसादाची संख्या ही माहिती कळवावी. देणगी शुल्क रोखीने संघाच्या कार्यालयाच्या किंवा श्री परशुराम पतसंस्थेच्या कार्यालयात अथवा संघाच्या अधिकृत बँक खात्यात जमा करावेत अथवा क्यू-आर कोड स्कॅन करून भरू शकता.

बँकेचे नाव : बँक ऑफ इंडिया, महाद्वार रोड, कोल्हापूर.

खाते नंबर : 090210110016181

**IFSC Code : BKID0000902**

नोंदणीसाठी व अधिक माहितीसाठी संपर्क
श्री. संतोष साने : 9459019091
श्री. ऋषिकेश लिमये : 9404260470

UPI ID:-gpay-11222531091@okbizaxis

आपले स्नहांकित,

मकरंद करंदीकर (अध्यक्ष) प्रसाद भिडे (उपाध्यक्ष)

केदार जोशी (कार्यवाह)

आणि सर्व संचालक मंडळ सदस्य

कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

वर्ष १२ वे : अंक ७ : ऑक्टोबर २०२६

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ.मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


### अनुक्रम


१) **संपादकीय** /४

२) **वत्सलाताई पोतनीस** /५ - वैदेही जोशी

३) **भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या**/७
- विकास मेहेंदळे

४) **ज्ञानसूर्याची सावली** /१०
- सौ. मंजुश्री गोखले

५) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'** /१३
- सौ. मंजुश्री गोखले

६) **पालकत्त्व** /१६ - कमला हर्डीकर
**काळ मोजणारे मंदिर** /२०
- आंतरजालावरून

७) **फडके साहेब** /२१ - प्रकाश हजारे

८) **मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा** /२२ - ओंकार गाडगीळ

९) **अवीट गोडीचे गीतरामायण** /२४
- श्री. सुधीर दाजी जोशी

१०) **वधूवर माहिती यादी** /२५



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५



- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. संजीव चिपळूणकर 9822421262
श्री. मोहन दातार 9881874701
श्री. महेश पटवर्धन 9822787931
श्री. सौरभ पाटणकर (सीए) 9970883939
श्री. अशोक दिवेकर 8626058450
श्री. महेश खाडिलकर 9422046611

- **कायदा सल्लागार**

ॲड. श्री. निनाद खरे 7057151549


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**

'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. २३ वर दिली आहे.


या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

वाजत गाजत आले आणि आनंदाची उधळण करून बाप्पा गेले ! आता येईल दुर्गा ! बाप्पा येतात समृद्धी घेऊन आणि देवी येते संरक्षण घेऊन ! त्या समृद्धीचं संरक्षण म्हणूनच तर देवीला म्हटलंय ना –

**माँ देवी सर्व भूतेषू मातृरूपेण संस्थिता ।**
**नमस्तस्यै नमस्तस्यै नमस्तस्यै नमो नम: ।।**

ती आई म्हटलं की पालनपोषण, संरक्षण. ती सगळंच करते, म्हणूनच 'मातृरूपेन संस्थिता' ! त्यात आपण कोल्हापूरवासी. म्हणजे साक्षात देवीनं आपल्याला मांडीवरच घेतलेलं. मात्र आजकाल नवरात्रात देवीला होणारी गर्दी बघितली की मात्र भीती वाटते. अर्थात, हल्ली हे प्रत्येक देवस्थानाचं असं झालंय! असो. आपण कळसाला बघून हात जोडावेत. देवी समजून घेईल. मागच्या अंकात मी म्हटलं होतं की, यानंतरचा अंक दिवाळी अंक असणार आहे. पण दसऱ्याचा अंक काढायला हवा ना? म्हणून यानंतरचा अंक निश्चित दिवाळी अंक असणार आहे. एक विशेष गोष्ट सांगू? आपल्या नवस्नेहच्या दिवाळी अंकाचा दर्जा इतका चांगला आहे ना, की तो बघून पार मुंबई, पुणे, जबलपूर येथून लेखक नवस्नेहला आपले लेख पाठवतात. आम्हीही ते कौतुकानं आणि अभिमानानं छापतो. कारण –

**कुछ अच्छा भी इकट्ठा उन्ही के पास होता है ।**
**जो बाँटना जानते है ।**

आणि ज्ञान तर वाटून वाढतंच ना? असो. या अंकात आपली नेहमीची सदरे तर आहेतच, पण भारताच्या दक्षिण टोकावर असलेल्या पद्मनाभ मंदिराची रंजक माहिती या अंकात तुम्हाला वाचायला मिळेल. ती फार विशेष माहिती तर आहेच, पण भारतीय स्थापत्यशास्त्र त्याही काळात किती प्रगत होतं हे वाचून आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. इतकी विलक्षण माहिती आहे या मंदिराची, नवस्नेहच्या वाचकांना ती नक्की आवडेल.

**जे जे उत्तम, उदात्त, उन्नत, महन्मधुर ते ते !**

असं आपल्या अंकात घेण्यासाठीच तर ही सगळी धडपड असते आमची. अर्थात तुमचाही प्रतिसाद असतोच ! पण तरीही तो कधीतरी फोनवर, पत्राद्वारे किंवा प्रत्यक्ष भेटीत आमच्यापर्यंत आला तर आम्हाला जास्त उत्साह वाटेल ! तुमच्या प्रतिक्रियांच्या प्रतिक्षेत आम्ही नेहमीच असतो. असो. पण आता येणाऱ्या दिवाळी अंकाच्या प्रतिक्रिया मात्र नक्की द्या हं !

आपल्या संघाचा गुणगौरव कार्यक्रम अत्यंत देखणा झाला. आपला दरवर्षीचा हा उपक्रम म्हणजे समाजाला एक कौतुकाची पावती असते. सामाजिक बांधिलकी जपण्याच्या या गोष्टी आहेत, आणि ती जपणं हे सामाजिक भान असण्याचं द्योतक आहे. असे अनेक उपक्रम आपण वर्षभर करत असतोच. आपलं नवस्नेह हा त्यातलाच एक महत्त्वाचा आणि देखणा (खरं ना?) उपक्रम ! आता येतेय नवरात्र आणि दसरा ! त्यानंतर दिवाळी ! त्यावेळी दिवाळी अंक ! तेव्हा हा दसरा सर्वांना उत्तम आरोग्य, अपूर्व सुखसमाधान आणि अपार समृद्धी देवो ही देवी चरणी प्रार्थना ! धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००


**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/– मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# वत्सलाताई पोतनीस

भारतीय स्वातंत्र्यलढ्याचा इतिहास केवळ पुरुषांच्याच पराक्रमाने नाही, तर महिलांच्या अभूतपूर्व त्यागाने आणि रक्ताने लिहिला गेला आहे. जेव्हा जेव्हा मातृभूमीवर संकट आले, तेव्हा स्त्रीने हातात तलवार धरली. केवळ युद्धभूमीवरच नाही, तर वैचारिक आणि गुप्त क्रांतिकारी चळवळीतही महिलांचा सहभाग मोलाचा होता. अशा अनेक ब्राह्मण समाजातील स्त्री शक्तीपैकी एक आहेत वत्सलाताई पोतनीस!!

आयुष्याच्या अखेरच्या श्वासापर्यंत सदैव उत्साही, हसतमुख, कार्यरत राहणारी, परोपकारी वृत्तीची, दिलदार, उदार, सेवाभावी, स्वावलंबी, निरालस, तसेच सगळ्यांवर प्रेम करणारी, समाजाबद्दल सदैव जिव्हाळा बाळगून मदतीचा हात पुढे करणारी आणि यामुळेच सगळ्यांची आवडती लाडकी ताई होती ती वत्सलाताई पोतनीस. देशभक्तीचा वारसा असलेल्या भुसावळच्या प्रथितयश तसेच प्रख्यात वकील अण्णासाहेब दास्ताने यांच्या कुटुंबात २९ फेब्रुवारी १९१६ साली महाशिवरात्रीला एक कन्या जन्मास आली. तिचे नाव वत्सला असे ठेवण्यात आले.

१९२० सालच्या स्वातंत्र्य लढ्यात भाग घेण्यासाठी अण्णासाहेबांनी आपली भरभराटीस आलेली वकिली सोडून दिली. त्यांच्या पत्नीने (वारूताई दास्ताने) त्यांना साथ दिली. आपल्या जवळील सगळे दागिने गांधीजींच्या आवाहनानुसार स्वातंत्र्य लढ्यासाठी, गांधीजींच्या स्वाधीन केले. मोठी बहीण शरयूताई धोत्रे, बंधू दत्तोबा, धाकटी बहीण बिंदुताई देवधर यांच्यासह आपल्या आईबरोबर, वत्सला विनोबाजींच्या आश्रमात दाखल झाली. अत्यंत कामसू, निरागस, हसतमुख वृत्तीच्या पण बुध्दिमान असलेल्या मुलीला विनोबांनी आपली मुलगी मानली आणि वत्सलेने विनोबांच्या वैयक्तिक कामांची पूर्ण जबाबदारी स्वीकारली. आश्रमीय पध्दतीने जीवन स्वीकारलेल्या वत्सलेने आपल्या नैसर्गिक वृत्तीने आश्रमवासियांची मने जिंकली. विनोबाजींनी 'गीताई'चे लिखाण सुरू केले होते. त्याचे दररोज वाचन ते करीत असत. वत्सला नियमितपणे विनोबाजींसमोर श्रोता म्हणून बसत असे. गीता खऱ्या अर्थाने तिने आपल्या जीवनाचाच भाग म्हणून अंगीकारले. स्वतः ती गीतामय झाली. सारे आयुष्य गीतेच्या आधारानेच ती जगली. समृद्ध झाली.

विनोबाजींनीच स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतलेल्या दत्तात्रय पोतनीस नावाच्या तरुणाबरोबर वत्सलेचे लग्न निश्चित केले. भुसावळ येथे आश्रमीय पद्धतीने १९३६ साली लग्न झाले. स्वतः कातलेल्या सुताचे हार वधु वरांनी परस्परांना घातले आणि हा लग्नसोहळा परिपूर्ण झाला. पती दत्तात्रय यांच्याबरोबर स्वातंत्र्य लढ्यात सहभागी होऊन वत्सला खेडोपाडी जनजागृतीचे कार्य करीत हिंडू लागली. हातात बांगड्या नाहीत, गळ्यात मंगळसूत्र नाही, कपाळाला कुंकू नाही. अंगावर खादीशिवाय कपडे नाहीत. अशी ही वत्सला पतीबरोबर खेड्यात हिंडायची तेव्हा गावातील स्त्री–पुरुष पोतनीसांना विचारीत, 'का हो तुमच्या या बहीणीचे असे कधी झाले !' म्हणजे एक तर वत्सला दत्तात्रयची बहीण मानली गेली. आणि अंगावर कोणतेही सौभाग्यलेणे दिसत नसल्यामुळे लोक तिला विधवा समजत असत. यामधून धडा घेऊन ताईने कपाळाला मोठे कुंकू लावायला सुरवात केली आणि कचकडीच्या का होईना, बांगड्या घालायला सुरवात केली. आयुष्यात कधीही तिने कानात काही घातले नाही.

१९३८ साली मालेगावला दत्तात्रय पोतनीस

यांनी 'गावकरी' या वर्तमानपत्राची सुरुवात केली. पूर्णपणे स्वातंत्र्यलढ्याला व जनजागृतीला वाहून घेतलेले हे वर्तमानपत्र सुरुवातीला साप्ताहिक होते. नंतर ते दैनिक झाले. कालांतराने मालेगावहून गावकरी नाशिकला स्थलांतरित झाले. आपल्या पतीच्या या नव्या कार्याला आपणही उपयुक्त व्हावे या भावनेतून ताई आपली कौटुंबिक जबाबदारी संभाळीत 'गावकरी' तही काम करीत होती. 'गावकरी' सुरू करण्यामागे राष्ट्रीय भावना जागृत करून राष्ट्रहित संवर्धनाचा हेतू आहे याची जाणीव वत्सलाताईंना होती. त्यामुळे 'गावकरी'च्या नफ्यातून खर्चासाठी आपण काहीही घ्यावयाचे नाही असा ताईने निर्णय घेतला आणि संसाराला आधार देण्यासाठी तिने शिक्षिकेची नोकरी स्वीकारण्याचे ठरविले. आश्रमी पध्दतीने तिचे शिक्षण झाल्यामुळे आणि शिक्षिकेसाठी किमान व्हर्नाकुलर फायनल पास होण्याची अट असल्यामुळे ती परीक्षाही ताईने उत्तीर्ण केली आणि शिक्षिका झाली.

या सर्व घडामोडी घडत असता १९४२ चा स्वातंत्र्यलढा सुरू झाला. दत्तात्रय आणि वत्सलाताई, दोघांनीही या लढ्यामध्ये स्वतःला झोकून दिले. आपली मुले लहान आहेत (मुलगी ४ वर्षाची मुलगा ६ वर्षाचा) याचाही त्यांनी विचार केला नाही. आपल्या लहान मुलांना समाजाच्या हाती देऊन ते दोघेही जेलमध्ये गेले. घरी मुलांना संभाळणारे कोणीच नव्हते, पण काही ओळखीची, तसेच गल्लीतील काही मंडळीनी या दोन लहान मुलांना स्वखुशीने स्वीकारले. घराजवळच कोपऱ्यावर राहणारा सदू गवळी सकाळ संध्याकाळी या मुलांना दूध देत असे. गोविंदराव देशपांडे तर कधी माधवराव जानोरकर तर कधी ताई रानडे त्यांना भरवीत असत. झोपायलाही मुले अशीच कोणाकडे तरी जात असत. सुरुवातीला ताईला सरकारवाड्यात ठेवले होते. वाड्याजवळच घर असल्यामुळे ही लहान मुले वाड्याच्या पायऱ्यावर रडत बसत. 'आमच्या आईला सोडा, कधी सोडता', असा टाहो फोडायची. काही पोलीसही त्यांना अधूनमधून खाऊ देत. काही दिवसानी ताईच्या आई वारुताई दास्ताने भुसावळवरून आल्या. पण ही लहान मुले सदैव आपल्या आईच्या शोधात दिवसभर भटकत असत आणि या मुलांना शोधण्यासाठी वृद्ध आजीची दमछाक होत असे. नंतर ताईला गंगापूर जेलमध्ये ठेवण्यात आले. लहान मुले कुणाच्या ना कोणाच्या सोबतीने, काही प्रसंगी आजीसह गंगापूर जेलकडे जात असत. तुरुंगाच्या गजाच्या आतूनच आपल्या मुलीची वेणीफणी ताई करीत असत. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर ताईने स्त्रियांसाठी गीताई मंडळाची स्थापना केली. या मंडळाचा दर एकादशीला गीताईच्या अध्यायाचे पठण करण्याचा उपक्रम आजही चालू आहे. विनोबाजीनी 'सर्वोदय' पत्र सुरू केले. या कार्यातही सक्रीय होऊन ताईने भरघोस मदत केली. आपला भार कोणावर पडू नये, आपल्यामुळे कोणाला त्रास होऊ नये म्हणून तिचे अटोकाट प्रयत्न चालू असत. वयाच्या ८८ वर्षापर्यंत ती स्वावलंबी होती. रोज ३-४ तास ऑफीसवर जाऊन काम करीत होती. खऱ्या अर्थाने स्थितप्रज्ञासारखे जीवन ती जगली. मन तरुण उत्साही होते. पण शरीर थकत चालले होते. जीवघेण्या दुखण्याना तोंड देत, अडचणींना समोरे जात, आयुष्यातील चढ उतार, सुख दुःखे आनंदाने पचवीत तिने आपल्या पतीबरोबरचे सहजीवन व्यतीत केले. ९ सप्टेंबर २००४ रोजी सगळ्यांना पोरकी करून ती पंचत्वात विलीन झाली. पण तिच्या कार्याने, विचाराने लोकांच्या मनात पेटविली गेलेली पणती आजही तेवत आहे.

स्वातंत्र्याचा जयघोष करणाऱ्या या अदम्य स्त्री शक्तीला मानाचा मुजरा!

**- वैदेही जोशी,**

मोबा. ९५४५६३५४६५

# ‘भारतरत्न’ सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या



‘भारतरत्न’ सर मोक्षगुंडम विश्वेश्वरय्या, त्यांचा जन्म १५ सप्टेंबर १८६१रोजी कर्नाटकातील कोलार जिल्ह्यात चिक्कबल्लापूर तालुक्यातील मुद्देनहळ्ळी येथे झाला. त्यांचे पूर्वज आंध्र प्रदेशातील कुर्नूल भागातील मोक्षगुंडम या गावचे. त्यांच्या वडिलांचे नाव पंडित श्रीनिवासशास्त्री व आईचे व्यंकचम्मा. वडील संस्कृतचे गाढे विद्वान होते. विश्वेश्वरय्या यांचे प्राथमिक शिक्षण चिक्कबल्लापूर या खेड्यात व अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत झाले तर उच्च शिक्षण बंगलोरच्या सेंट्रल कॉलेजमध्ये झाले. १८८० मध्ये ते बी. ए. परीक्षा विशेष गुणवत्तेत उत्तीर्ण झाले. म्हैसूर सरकारने पुढील शिक्षणासाठी त्यांना शिष्यवृत्ती दिली. १८८३ मध्ये ते पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयातून मुंबई विद्यापीठाची अभियांत्रिकीची पदवी परीक्षा प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. या परीक्षेत ते मुंबई प्रांतात पहिले आले. स्थापत्यशास्त्रातील त्यांच्या ज्ञानाचा लौकिक सर्वदूर पसरला.

१८८४ मध्ये मुंबई सरकारच्या सार्वजनिक बांधकाम खात्यात त्यांची साहाय्यक अभियंता पदावर नियुक्ती झाली. नासिक जिल्ह्यात त्यांची प्रथम नियुक्ती झाली. न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे त्यांना मौलिक मार्गदर्शन लाभले. पुणे व गुजरातमधील सुरत जिल्ह्यात त्यांनी काम केले. १९०४ साली शासनाने आरोग्य अभियंता या पदावर त्यांना बढती दिली. खडकवासला येथील जुन्या दगडी बांधकामाच्या धरणात त्यांनी संशोधन करून तयार केलेली स्वयंचलित शीर्षद्वारे पहिल्यांदा बसविण्यात आली होती. त्यांच्यामुळे त्यांनी पाण्याचा अपव्यय टाळला. १९०६ साली एडनला लष्करी वसाहतीसाठी त्यांची साहाय्यक बंदर अधिकारी म्हणून नेमणूक झाली. त्यापूर्वी त्यांनी मुंबई सरकारच्या सचिवालयात सार्वजनिक बांधकाम खात्यांतर्गत पाटबंधारे विभागात विशेष अधिकारी म्हणून काम केले. पुण्याच्या डेक्कन क्लबच्या स्थापनेत त्यांनी भाग घेतला.

१९०७ साली मुंबई सरकारच्या नोकरीतून त्यांनी स्वेच्छा निवृत्ती स्वीकारली. १९०९ साली हैदराबाद संस्थानात विशेष सल्लागार अभियंता म्हणून त्यांनी कार्यभार स्वीकारला. हैदराबाद शहराची पुनर्रचना, मूसा व इसा या दोन्ही नद्यांना धरणे बांधून संभाव्य पुरापासून शहराचे संरक्षण ही कामे त्यांनी केली. याच वर्षी म्हैसूर संस्थानचे नरेश महाराजा कृष्णराज वाडियार यांच्या विनंतीनुसार त्यांनी म्हैसूर संस्थानच्या प्रमुख अभियंता पदाची सूत्रे हाती घेतली. १९१२ ते १९१८ ही सहा वर्षे म्हैसूर संस्थानचे दिवाण म्हणून शिक्षण, उद्योग,कृषी आदी सर्व क्षेत्रांत त्यांनी नेत्रदीपक कामगिरी केली. म्हैसूर आर्थिक परिषदेला स्थायी रूप देऊन अनेक विकासकामे हाती घेतली. उदा., म्हैसूर बँक, म्हैसूर विद्यापीठ, प्राथमिक शिक्षणाचा विस्तार, मुलींचे पहिले वसतिगृह व शेतकी महाविद्यालय, वृंदावन गार्डन यांची उभारणी, कन्नड साहित्य अकादमी, आर्थिक लेखा परीक्षणाबरोबरच कार्यक्षमता लेखा परीक्षण वगैरे.

रेशीम उत्पादन, चंदन तेल, साबण, धातू व क्रोम टॅनिंग, सिमेंट, साखर कारखाने, लघू उद्योग, हॉटेल व उपाहारगृहे, विश्रामधाम, मुद्रणालये, क्लब यांच्या निर्मिती उद्योगास त्यांनी चालना दिली. म्हैसूरसाठी भाटकलला बंदराची सोय केली. आपल्या प्रयत्नांनी रेल्वेचे व्यवस्थापन राज्य सरकारच्या कक्षेत आणले. काही ठिकाणी नवीन रेल्वे मार्ग उभारले. सेवाभरती शर्ती, मागासवर्गीयांसाठी राखीव जागा आदी समाजोन्मुख कार्ये त्यांनी केली. १९२६ साली त्यांनी म्हैसूर संस्थानच्या सेवेचा स्वेच्छेने राजीनामा दिला. त्यानंतर त्यांचा भद्रावती आयर्न अँड स्टील वर्क्स, श्री जय चामराजेंद्र ऑक्युपेशनल इन्स्टिट्यूट वगैरे संस्थांशी घनिष्ट संबंध आला. मुंबईची प्रिमियर ऑटोमोबाइल इंडस्ट्री स्थापण्यातही त्यांनी विशेष प्रयत्न केले. हिंदुस्थान एअरक्राफ्ट फॅक्टरी (सध्याची दि हिंदुस्थान एरॉनॉटिक्स) व ग्रामीण औद्योगिक प्रकल्पांच्या योजनेतही त्यांनी भाग घेतला.

विश्वेश्वरय्या यांच्या विलक्षण बुद्धिमत्तेने देशातील अनेक योजना साकार झाल्या. धुळे जिल्ह्यातील पांजरा नदी ते दात्रटीपर्यंत वक्रनलिकेने पाणीपुरवठा ही योजना साकार करून त्यांनी धुळे शहर पाणीपुरवठा योजना व सुरत शहर पाणीपुरवठा योजनाही साकार केली. सक्कर शहराच्या पाणीपुरवठ्याचा बिकट प्रश्न त्यांनी सक्कर बंधाऱ्यांची उभारणी करून सोडविला. शेतीला पाणीपुरवठा करण्याच्या व कमीत कमी पाण्यात अनेक तऱ्हेच्या पिकांना पाणी देण्याची गट पद्धती त्यांनीच सुरू केली. ओरिसा राज्यातील महापूराच्या नियंत्रणाचे निर्मातेही तेच. म्हैसूरपासून १८ किमी. वरील कृष्णराजसागर हे प्रचंड धरण स्वातंत्र्यपूर्व काळातच त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली बांधले गेले. सुमारे ४० मीटर उंचीला लागणारा पाया लक्षात घेऊन धरणाच्या कामाला सुरुवात केली. आज या धरणामुळे ८ हजार हेक्टर जमीन पाण्याखाली येते. १२.५ कोटी रुपयांची कावेरी बंधारा योजना त्यांनीच पूर्ण केली. यांखेरीज कोल्हापूर, मुंबई, कराची, धारवाड व विजापूर शहर पाणीपुरवठा योजना त्यांनीच कार्यान्वित केल्या. पुणे, हैदराबाद व म्हैसूर येथील भुयारी गटार योजना त्यांनी अभिकल्पित केल्या. नवी दिल्लीची योजनाबद्ध सुधारणा त्यांनीच केली. पुण्याच्या अभियांत्रिकी महाविद्यालयाचा अभ्यासक्रम ठरविण्यात त्यांचे महत्वपूर्ण योगदान होते.

विश्वेश्वरय्या यांनी अनेक संस्थांवर व समित्यांवर केलेले कार्य मौलिक स्वरूपाचे आहे. मुंबई औद्योगिक शिक्षण समितीचे अध्यक्ष (१९२१-२२), भारतीय अर्थविषयक समितीचे अध्यक्ष (१९२५), मुंबई महानगरपालिका काटकसर समितीचे अध्यक्ष, मुंबई बॅक बे चौकशी समितीचे अध्यक्ष, नवी दिल्ली राजधानी समितीचे सल्लागार, भद्रावती पोलाद कारखान्याचे चेअरमन अध्यक्ष, अखिल भारतीय उत्पादक संस्था (१९४१) संचालक, जमशेटपूर टाटा लोखंड व पोलाद कारखाना, मुंबई विद्यापीठाचे अधिछात्र, मुंबई प्रांत आरोग्य समितीचे सदस्य, मुंबई विद्यापीठाच्या रासायनिक उद्योग उन्नती समितीचे अध्यक्ष म्हणून त्यांनी केलेले कार्य विशेष उल्लेखनीय आहे. मुंबई, कराची, बडोदा, सांगली, मोरवी, भोपाळ, पंढरपूर, अहमदनगर, नागपूर, भावनगर,राजकोट, गोवा या नगरपालिकांना त्यांनी आर्थिक अडचणीत मार्गदर्शन केले.

विश्वेश्वरय्या यांनी पाच वेळा अमेरिकेचे दौरे केले. खेरीज जपान, इटली, इंग्लंड, स्वीडन, रशिया, कॅनडा, सिलोन (श्रीलंका), जर्मनी व फ्रान्स या देशांना विविध निमित्तांनी भेटी दिल्या.शिस्त हा त्यांच्या परवलीचा शब्द होता. ते सतत कठोर परिश्रम करीत. प्रत्येक काम नियमित, नीटनेटके व स्वच्छ असावे हा त्यांचा आग्रह असे.

भारताच्या प्रगतीसाठी आपल्या भाषणांतून व लेखनांतून ते तळमळीने विचार मांडीत. भारताच्या भवितव्यासाठी राष्ट्रीय संरक्षणातील धोके, राष्ट्रीय चारित्र्य, राष्ट्रबांधणी व राष्ट्रीय कार्यक्षमता या विषयांवर त्यांनी व्यक्त केलेले विचार मार्गदर्शक होतील. आपल्या विषयातील त्यांचे ज्ञान अत्यंत

अचूक होते. एकदा रेल्वेतून प्रवास करीत असताना रेल्वेच्या बदललेल्या आवाजावरून त्यांनी १.५ किमी. वरील रेल्वे रूळ उखडले आहेत असे अचूक अनुमान काढून हजारो प्रवाशांचे प्राण वाचविले होते. रिकन्स्ट्रक्टिंग इंडिया (१९२०), प्लॅन्ड इकॉनॉमी फॉर इंडिया (१९३४), प्रॉस्पेरिटी थ्रू इंडस्ट्री, मेम्वॉयर्स ऑफ माय वर्किंग लाइफ (१९६०) ही त्यांची पुस्तके विशेष प्रसिद्ध आहेत.

नवभारताचे एक निर्माते म्हणून विश्वेश्वरय्या यांच्या विविधोपयोगी कार्याचा व त्यांच्या ज्ञानाचा अनेक संस्थांनी, विद्यापीठांनी व शासनांनी गौरव केला. लोकांमध्ये ते एम्. व्ही. या नावाने परिचित होते. ब्रिटिश सरकारने त्यांना सर हा किताब दिला. मुंबई, कलकत्ता, काशी, पाटणा, अलाहाबाद व म्हैसूर या विद्यापीठांनी त्यांना सन्माननीय डी. लिट्. देऊन गौरवले. १९५५ साली भारत सरकारने त्यांना सर्वोच्च सन्मान 'भारतरत्न' देऊन गौरवले. त्यांच्या सन्मानाप्रीत्यर्थ पोस्टाचे तिकीट काढले. विश्वेश्वरय्यांनी अनेक संस्थांना लाखो रूपयांच्या देणग्या दिल्या. देशातील अनेक संस्थांना विश्वेश्वरय्या यांचे नाव कृतज्ञतेने देण्यात आले आहे. सर विश्वेश्वरय्या यांची स्मृती म्हणून कर्नाटक सरकारने बंगलोर येथे 'सर विश्वेश्वरय्या सायन्स म्युझियम' उभारले आहे. हे म्युझियम भारतातील सर्वांत मोठे सायन्स म्युझियम आहे. त्यांच्या नावाने त्यांच्या जन्मदिनी अभियांत्रिकी क्षेत्रातील मान्यवरांस प्रत्येक वर्षी पुरस्कार दिला जातो. त्यांचा जन्मदिन 'अभियंता दिन' म्हणून भारतभर साजरा केला जातो. महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम खात्यातर्फेही १९९८ पासून त्यांचा जन्मदिन 'अभियंता दिन' म्हणून साजरा करण्याचे घोषित झाले. गुणवत्ता संवर्धन व सचोटीला प्रोत्साहन मिळावे म्हणून भारतरत्न सर विश्वेश्वरय्या यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र शासनाने १९९७ पासून 'उत्कृष्ट अभियंता पुरस्कार' देण्यास सुरुवात केली आहे.

विश्वेश्वरय्यांनी आपल्या जन्मगावी सुंदर घर बांधले असून १९७१ मध्ये त्याचा राष्ट्रीय स्मारकात समावेश केला गेला आहे. या घरातील वस्तुसंग्रहालयात विश्वेश्वरय्या यांच्या नित्य वापरातील काही वस्तू, त्यांना मिळालेल्या भेटवस्तू व भारतरत्न गौरवपदक ठेवण्यात आले आहे. गावातील विशाल बागेत त्यांचा अर्धपुतळा बसविण्यात आला आहे. १४ एप्रिल १९६२ बंगलोर येथे या शतायुषी महापुरुषाचे निधन झाले.

**– विकास मेहेंदळे,**
मोबा. ९४२०१५५११४

**दिनविशेष ऑक्टोबर २०२६ पराभवनाम संवत्सरे** **सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**
**भाद्रपद-अश्विन १९४८** **श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**शुक्रवार दि. २ :** श्री ज्ञानेश्वर जयंती, म. गांधी जयंती, लालबहादूर शास्त्री जयंती, **रविवार दि. ११ :** घटस्थापना (शारदीय नवरात्रारंभ), **गुरुवार दि. १५ :** ललिता पंचमी, जागतिक अंध साहायता दिन, **रविवार दि. १८ :** ज्योतिर्लिंग जागर, महालक्ष्मी पूजन (घागरी फुंकणे), **सोमवार दि. १९ :** महालक्ष्मी जागर, महाष्टमी, **मंगळवार दि. २० :** खंडेमहानवमी, विजयादशमी, दसरा, **रविवार दि. २५ :** कोजागरी पौर्णिमा, शरद पौर्णिमा, **सोमवार दि. २६ :** नवान्न पौर्णिमा, महर्षी वाल्मिकी जयंती, **गुरुवार दि. २९ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ८.५३ वा.), **शुक्रवार दि. ३० :** राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी, **शनिवार दि. ३१ :** सरदार पटेल जयंती, इंदिरा गांधी स्मृतिदिन.

### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या 'ज्ञानाच्या सोपानाची' जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

### (लेखांक चव्वेचाळिसावा)

आता सगळ्यांच्या घरात तयारी सुरू झाली तीर्थयात्रेला जाण्याची. निवृत्ती, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ता हे चौघे तर जाणार होतेच; पण त्यांच्यासमवेत जाणार होती नामदेव, गोरोबा, सावता ही संतमंडळी आणि गावातली इतर काही जण. चार दिवसानंतरचा प्रस्थान-मुहूर्त निघाला आणि सगळ्यांच्या घरी तयारी सुरू झाली. नामदेवाच्या घरी तर गोणाई, राजाई आणि जनाबाईच्या हाताला जराही उसंत नव्हती. ओला शिधा, कोरडा शिधा, तहानलाडू, भूकलाडू, दशम्या, पोहे, कोरड्या चटण्या, धपाटे, बिट्ट्या, रेवड्या, सारनोळ्या असं सगळं करायचं होतं. कुठून-कुठून जायचं? कसं कसं जायचं याच्या योजना चालल्या होत्या. अवघं पंढरपूर जणू यात्रेच्या तयारीत गुंतलं होतं. जाणारी होती मोजकीच; पण प्रत्येकाच्या घरचं कुणीतरी निघाल्यासारखं घराघरात वातावरण होतं. सगळीकडे उत्साह होता, आनंद होता, उत्सुकता होती, गडबड होती, उल्लास होता, योजना केल्या जात होत्या. चर्चा होत होत्या, वाद-संवाद झडत होते. सर्वसमावेशक असा भागवत धर्म असा अवघा आनंदीआनंदी घेऊन आला होता.

सगळ्यांची जोरदार तयारी सुरू होती, तोच नेवाशाहून सच्चिदानंदबाबा आले आणि त्यांनीही तीर्थाटनाला येण्याची इच्छा प्रकट केली. सर्वांनी त्यांचं स्वागत केले. मृत्यूला मिठी मारून पुन्हा केवळ ज्ञानादादाच्या हस्तस्पर्शानं जिवंत झालेले सच्चिदानंदबाबा सर्वांच्या परिचयाचे आणि आपल्या ऋजू स्वभावामुळे सर्वांना प्रिय झाले होते. त्यांच्या येण्यानं सर्वांनाच आनंद झाला. तीर्थाटनाची सर्व तयारी पूर्ण झाली होती. मंडळी निघाली. पंढरपूरहून आळंदीला आली. तिथून पुन्हा एकवार पैठणला जाताना वाटेत नेवासे इथे मोठा मुक्काम पडला, कारण बहुजन समाजाला भगवद्गीतेतलं ज्ञान कळावं, म्हणून ज्ञानादादानं भगवद्गीतेवर अनुवाद आणि विश्लेषण करून टीका करण्याचा संकल्प सोडला आणि शतकातल्या एका महान कार्याला सुरुवात झाली. ज्ञानादादानं गणेशस्तवनानं सुरुवात केली –

**ॐ नमोजी आद्या। वेद प्रतिपाद्या।**
**जय जय स्वयंवेद्या। आत्मरूपा।।**

आणि एका पाठोपाठ एक ज्ञानधारा त्याच्या मुखातून स्रवू लागल्या. सच्चिदानंदबाबा मसीपात्र घेऊन लिहायला बसले आणि बघता-बघता श्रीमद्भगवद्गीतेच्या १८ अध्यायांतल्या ७०० ओव्यांवर आधारित भावार्थदीपिकेची मिरास सांभाळणारा ९१३४ ओव्यांचा 'ज्ञानेश्वरी' हा ग्रंथ तयार झाला. भगवद्गीतेच्या प्रत्येक ओवीवर नेवासे येथे जमलेल्या प्रचंड श्रोतृवर्गासमोर ज्ञानादादा भाष्य करत होता आणि सच्चिदानंदबाबा मोठ्या भक्तिभावानं ते लिहून घेत होते. आतापर्यंत बहुतांश लोकांना अप्राप्त असणारा, बहुतेक जणांना दुष्प्राप्य असणारा, दुर्बोध वाटणारा, श्रीमद्भगवद्गीतेसारखा महान ग्रंथ आता मराठीची मिरास मिरवत सामोरा येत होता. युगायुगांमध्ये अभूतपूर्व ठरेल, अशी ही अलौकिक घटना होती. अलौकिक प्रतिभेचा तो आविष्कार, म्हणजे एका महापर्वाची नांदी होती. आपण या आविष्काराचे साक्षीदार होत आहोत, या विचारानंच सोपान रोमांचित झाला. आपल्या ज्ञानादादाच्या अलौकिक प्रतिभेचं त्याला विलक्षण अप्रूप वाटलं. 'ज्ञानेश्वरी' लिहून झाली आणि नेवासेकरांचा भावपूर्ण निरोप घेऊन मंडळी पुढे निघाली. ज्ञानेश्वरीची चर्चा करण्यात, काही मनन-चिंतन करण्यात ज्ञानादादा गुंगलेला असायचा. अशा वेळी सभोवती जमलेल्या श्रोतृवृंदाला उद्बोधन देण्याची, प्रबोधन करण्याची जबाबदारी सोपानावर यायची आणि मग त्याच्याही प्रतिभेला बहर यायचा.

याच प्रवासात मग सोपानानं हरिपाठाचे काही अभंग रचले.

**या जनार्दने पाठें। जाई जे वैकुंठे।**
**हरिनाम गोमटे। मुखी घेई।।**
**वायाचे भ्रमसी। कां रे गुणरासी।**
**वेगी केशवासी। भजत जाय।।**
**शरीर पोसीसी। कबाड उपसीसी।**
**हे न ये कामासी। अंती तुझ्या।।**
**सोपान सांगत। ऐक तू दृष्टान्त।**
**हरीच मुखात। गाय वेगी।।**

आणि या वेळी मात्र रचनेची सुबकता, अर्थाची प्रवाहिता, शब्दांचा नेमकेपणा आणि ओवीच्या साडेतीन मात्रा यांचा एक सुरेख संगम सोपानाच्या या अभंगात झाला. पहिले चार अभंग रचून ते निवृत्तीदादाला दाखवल्यावर निवृत्तीदादानं प्रेमभरानं मिठी घालून सोपानाला जवळ घेतलं आणि ती मिठी, तो स्पर्श, तो आवेग, तो आनंद, तो अभिमान या सर्वांनी जणू एकत्रितपणे सोपानावर गारूड केलं. निवृत्तीदादानी मारलेल्या त्या मिठीमध्ये बंधूप्रेमाची उत्कटता तर होतीच होती; पण गुरुकृपेची अनुपम साक्षही होती. आपला शिष्य आता पारंगत झाला असल्याची ती उत्कट साक्ष सोपानाला एक वेगळेच अस्तित्व देऊन गेली. वेगळे अस्तित्व ! सर्वांपासून ! अगदी निवृत्तीदादा, ज्ञानादादा पासूनसुद्धा !

**संसारी आलीया। कां रे नोळखीसी**
**नरहरी न म्हणसी। एक भावे ।।**
**जप नाम विद्या। विद्या जप नाम**
**संसारी हा जन्म। गेला वृथा।**
**एकासी भजावे। परमालागी जोडावे**
**हे वर्मबीज सांगावे। कवणे ते।।**

वय अवघं चौदा-पंधरा, ओठ पिळले, तर दूध निघेल, असं कोवळं वय; पण पारमार्थिक ज्ञानानं ओसंडून वाहणारे शब्द, अगदी कुणालाही समजेल, अशी सोपी भाषा आणि लालित्य घेऊन गुंजणारी शब्दरचना. सोपान असा अवघा खुलत होता. उमलत होता. फुलत होता !

बघता-बघता यात्रा संपली. तीर्थाटन संपलं. ज्ञानादादाने आपल्या अलौकिक योगसामर्थ्याची साक्ष अनेक ठिकाणी देऊन लोकांना आपलंसं केलं. त्याच्या बुद्धिवैभवानं लोक भारावून जात. त्याच्या शब्द सौंदर्यानं लोक भारले जात असत. त्याच्या ज्ञानवैभवानं लोक दिपून जात असत, तर त्याच्या शब्द लाघवानं मंत्रमुग्ध होत असत. यातल्या प्रत्येक क्षणी सोपान, ज्ञानादादासमवेत असायचाही आणि नसायचाही. असायचा अशा रीतीनं, की ज्ञानादादाच्या प्रत्येक कार्यात, प्रत्येक क्षणी सोपान सावलीसारखा त्याच्यासोबत राही; पण ज्ञानादादाचा प्रत्येक शब्द, त्याची प्रत्येक हालचाल, त्याचं प्रत्येक ठिकाणचं बोलणं लक्षपूर्वक ऐकत असतानाच तो तटस्थपणेही सर्वांचा विचार करे. एक प्रकारे एकलव्यासारखं सोपानही स्वयंशिक्षण घेत होता. आत्मअध्ययन करत होता.

मंडळी यात्रेहून परतली. पार अगदी उज्जैन, प्रयाग, द्वारका हस्तीनापूर सगळीकडे जाऊन सर्वसमावेशक अशा भागवत धर्माची पताका रोवून आली. बरेच महिने लोटले होते. सगळी आपापल्या घरी परतली. निवृत्तीदादाही तिन्ही भावंडांना घेऊन आळंदीला परत आला. पूर्वीचा रोजचा दैनंदिन कार्यक्रम सुरू झाला; पण आता सोपान आत्मअध्ययनातच रमत होता. आळंदीला आल्यावर त्यानं एक दिवस एकटाक बसून हरिपाठाचे अभंग पूर्ण केले.

**आम्ही नेणो काया। नेणो गती माया**
**ब्रह्मी ब्रह्मलया। आम्हामाजी।।**
**मी तू पण गेले। ब्रह्मी मन ठेले।**
**वासना ती जाणे। ब्रह्म झाली।।**
**बीज सर्व भाव। आपणचि देव**
**केला अनुभव। गुरुमुखे।।**
**सोपान हा ब्रह्म। वर्ततसे सम**
**प्रपंचाचे काम। नाही नाही।**

सोपान लिहीत होता आणि निवृत्तीदादा तिथं आला. सोपानाचं लक्षच नव्हतं. तो लिहिण्यात इतका मग्न झाला होता, की निवृत्तीदादानं येऊन त्यानं लिहून ठेवलेलं पानं उचलून वाचलं, तरी त्याचं लक्ष नव्हतं. निवृत्तीदादानी पानं उचललं. डोळ्यांसमोर धरलं आणि सर्वप्रथम त्याच्या नजरेत भरलं ते सोपानाचं सुंदर हस्ताक्षर ! अगदी सुस्पष्ट, नीटनेटकं, एकसारखं. एखादी सुंदर मोत्यांची माळ दोरा तुटून विखुरावी आणि नंतर पुन्हा कुणीतरी ते विखुरलेले मोती एकाजवळ एक असे क्रमानं लावून ठेवावेत, तसं सोपानाचं हस्ताक्षर होतं. स्वच्छ, सुंदर, नितळ अगदी सोपानाच्या मनासारखं! निवृत्तीदादानी वाचायला सुरुवात केली.

**सागरीचे तोय। जगी निववीत**
**मागुता भरत। पूर्णपणे।।**
**तैसे आम्ही दास। तुजमाजी उदास**
**तू सर्व निवास। आमुचा देवो।।**
**तुजमाजी विरू। सुखःदुख विसरू**
**तुझ्यानामे तरू। याची जन्मी ।।**
**सोपान ऐसा। बोलूनी सरळ**
**तिष्ठत गोपाळ। अभय देत ।।**
**दिव्य व्योम तारा। ग्रहणे शेषी**
**एक ऋषीकेशी। सर्व आम्हा।।**
**ब्रह्मविण नाही। रिता ठाव पाही**
**या निवृत्तीच्या पायी। बुडी दे कां ।।**
**निखळ हे सर्व। आत्माराम सर्व**
**नाही देहभावा। विकल्पता ।।**
**सोपान निकट। गुरुनाम पेठ**
**नित्य हे वैकुंठ। जवळी असे।।**

वाचता-वाचता निवृत्तीदादाला भरून आलं. घशात गहिवर दाटला. काळजात हुंदका कोंडला. कितीतरी दिवसांनी, आज कितीतरी दिवसांनी निवृत्तीदादाला असं भरून आलं होतं. सोपानदेवाचं सुरेख हस्ताक्षर, स्वच्छ लिखाण, नेमकी शब्दरचना, सखोल अर्थ आणि अन्वयार्थ म्हणजे तर, पारमार्थिक निर्गुण अनुभूतीचा स्वाभाविक उद्गार होता तो! निवृत्तीदादाच्या डोळ्यांतून अश्रू ओघळू लागले. एक अस्फुट हुंदकाही फुटला आणि तो अस्फुट ध्वनी सोपानानं ऐकला. त्यानं चमकून नजर उचलून समोर पाहिलं. निवृत्तीदादाला समोर बघितल्यावर सोपान संकोचला; पण दादाच्या डोळ्यांतून वाहणारे पाणी बघून सोपानालाही भरून आलं. त्यानं आपल्या हातातलं पान निवृत्तीसमोर धरलं. त्यात लिहिलं होतं.

**निवृत्ती सोपान। परिसा भागवत**
**पंढरी निवांत। विठ्ठल गाती।।**
**धन्य तेचि नामा। ज्ञानदेव पाही**
**सनकादिक बाही। उभे देखा।।**
**पुंडलिक भक्त। देव मुनी सर्व**
**शुद्ध चरणी भाव। अर्पिताती।।**
**सोपान डींगर। आनंदे नाचत**
**प्रेमे ओवाळित। हरिच्या दासा।।**

कोणत्याही प्रकारची क्लिष्ट शब्दरचना न करता, कोणत्याही उत्प्रेक्षा, अलंकारांचा, रूपक-प्रतिमांचा आधार न घेता, अगदी सामान्यातल्या सामान्य जिवाला समजावी अशी सुभग रचना होती ती ! आपला हा धाकटा भाऊ त्याच्या निष्पाप, निर्व्याज मनासारखी स्वच्छ, निर्मळ शब्दरचना करतोय, हे निवृत्तीदादाच्या लक्षात आलं आणि या सोपानाचं मन आणि अभंग खरोखरच किती पारदर्शी आहेत, याचं कौतुक त्याच्या नजरेत उमटलं. तो कौतुकाचा कटाक्ष सोपानाकडे टाकून निवृत्तीदादांनी त्याच्या कुरळ्या केसांतून प्रेमानं हात फिरवला आणि तो आत गेला. नंतर कितीतरी वेळ, कितीतरी वेळ दादाच्या स्पर्शात आपल्याला आईचा स्पर्श कसा जाणवला, या विचारात सोपान बुडून गेला आणि हा विचार करताना आपल्या डोळ्यांतून अखंड अश्रू ओघळताहेत, याचंही भान त्याला राहिलं नाही.

(क्रमशः)

**- सौ. मंजुश्री गोखले,**
मोबा. ८८०५३५५२००

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

अध्याय १० – **विभूतियोग**

**तुझी विभूती आत्मयोगे विस्तारे करून । वेळोवळां होय अमृतपान ।। हें मज सांगा प्रसन्न होऊनी । स्वामी जनार्दना ।।**
त्या विभूति तसा योग आपुला तो सविस्तर ।
पुन्हां सांग नव्हे तृप्ति सेवितां वचनामृत । ।।१८।।

**श्रीभगवानुवाच ।**
**श्रीकृष्ण म्हणती अर्जुनाप्रती । माझिया विभूति बहुत असती । तयामाजी श्रेष्ठ श्रेष्ठ सांगेन तुजप्रती । येरा पाहतां अंत नाही ।।**
बरें मी सांगतो दिव्य मुख्य मुख्य चि त्या तुज ।
माझा विभूति-विस्तार न संपे चि कुठे कधीं ।।१९।।

**तरी अर्जुना अवधारी । मी आत्मा सर्व भूत शरीरी । आदि मध्य निर्धारी । सर्व भूतांसी अंत मीच जाण ।।**
राहतों आत्म-रूपाने सर्वांच्या हृदयांत मी ।
भूत-मात्रास मी मूळ मध्य मी मी चि शेवट ।।२०।।

**आदित्यामाजी मी विष्णु । तेजाचे ठायी मी भानु । मरुद्‌गणांमाजी मरीचि होउनु । नक्षत्रांमाजी चंद्र तो मी।।**
आदित्यांत महा-विष्णु ज्योतिष्मंतांत सूर्य मी ।
मरीचि मुख्य वायूंत मी नक्षत्रांत चंद्रमा ।।२१।।

**वेदांमाजी सामवेद । देवांमध्ये इंद्र प्रसिद्ध । इंद्रियांत मन संबंध । भूतांचे ठायी ज्ञान तें मी ।।**
मी साम-वेद वेदांत असे देवांत इंद्र मी ।
चेतना मी चि भूतांत मन तें इंद्रियांत मी ।।२२।।

**रुद्रांमध्ये शंकरु । यक्षरक्षसांमाजी धरेश्वरु । वसूंमध्ये वैश्वानरु । पर्वतांमाजी मेरु तो मी ।।**
कुबेर यक्ष-रक्षांत मी रुद्रांत सदाशिव ।
वसूंत मी असें अग्नि असे उंचांत मेरु मी ।।२३।।

**अष्ट पुरोहितांमाजी बृहस्पती । दलधिपतीमाजी स्कंध म्हणती । सरतामांजी जान्हवी निश्चिती । तो मीच जाण।।**
पुरोहितांत तूं जाण मुख्य तो मी बृहस्पति ।
सेनानींत तसा स्कंद जल-राशींत सागर ।।२४।।

**सप्त ऋषीमाजी भृगु ऋषेश्वरु । जपामाजीं एकाक्षरु । यज्ञांमाजी जप यज्ञेश्वरु । स्थावरांमाजी हिमालय ।।**
मी एकाक्षर वाणींत महर्षींत असे भृगु ।
जप मी सर्व यज्ञांत मी स्थिरांत हिमालय ।।२५।।

**वृक्षामांजी अश्वत्थ प्रसिद्ध । देवऋषीमाजी नारद । गंधर्वामध्ये चित्ररथ प्रसिद्ध । सिद्धांमाजी कपिलो मुनी।।**
सर्व वृक्षांत अश्वत्थ मी देवर्षींत नारद ।
मी चित्ररथ गंधर्वी सिद्धी कपिल मी मुनि ।।२६।।

**अश्वांमाजी उच्चैश्वरा वारु । गजांमाजी ऐरावत कुंजरु । हे समुद्रमंथनी जाले साकारु । नरांमाजी राजा तो मी ।।**
अश्वी उच्चै:श्रवा जो मी निघालो अमृतांतुनी ।
ऐरावत गजेंद्रांत मी नरांत नराधिप ।।२७।।

**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत. तसेच ज्यांना नवस्नेहचा अंक मिळाला नसेल त्यांनी संघ कार्यालयात कळवावे. त्यांना अंकाची पीडीएफ व्हॉटस्ॲपवर पाठविली जाईल.**

# मुलांचे पान



» चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



# मनाला खुपणारं कागदावर

# पालकत्त्व

## (लेखांक १५)

मागील लेखातील सुजाण पालकत्त्वाच्या काही पैलूंना स्पर्श करताना पाल्याचे भविष्य घडविण्यासाठी शिक्षणाचा विचार करताना आपल्या पाल्याची आवड, त्याची बौद्धिक कुवत, अभ्यास करण्याची, कष्ट करण्याची प्रवृत्ति या साऱ्या गोष्टींचा विचार केला पाहिजे. थोडक्यात, कटू असलं तरी वास्तवाला सामोरं गेलं पाहिजे. सत्य किंवा वास्तवाची जाणीव असेल तर कोणतीही गोष्ट करणे सोपे जाते. नाहीतर त्या मांजराच्या गोष्टीसारखं होतं.

थंडीचे दिवस होते. सूर्य अजून क्षितिजावरच होता. मांजर सूर्याकडे पाठ करून बसलं होतं. आपली भली मोठी सावली बघून मांजर म्हणालं, 'पोटभर भूकेसाठी आज मला एखादा घोडा मारून खाल्ला पाहिजे. घोड्याचा शोध घेऊन मांजर घोड्याच्या पाठीवर चढलं. क्षणात घोड्यानं माजंराला खाली टाकलं आणि दौडत निघून गेला. सकाळचे नऊ वाजून गेले होते. मांजरानं आपली सावली बघितली आणि त्याला वाटलं आपण काही फार मोठे नाही. पोट भरण्यासाठी लहानसा ससाही पुरेसा आहे. सशाचा पाठलाग करून मांजर थकलं. ससा बिळात निघून गेला. खूप वेळ सरला होता. सूर्य डेक्यावर आला होता. मांजरानं पाहिलं त्याची छोटीशी सावली पडली होती. मांजर म्हणालं, 'मी किती लहान आहे. वाटीभर दूध किंवा उंदराचं पिटुकलं मला मिळालं की पुरे.' मांजराला वास्तव समजलं. त्याचं पोट भरलं.

पालक आणि पाल्य यामध्ये संवाद पाहिजे. त्यांच्यामध्ये आदरयुक्त जवळिक पाहिजे. त्यांच्या शाळेतील, महाविद्यालयांतील गमती-जमती ऐकण्यांत तुम्ही थोडा कां होईना रस घेतला पाहिजे त्यांच्या शिक्षकांविषयी, त्यांच्या शिकविण्याच्या पद्धतीविषयी बोला, पण शिक्षकांविषयी एकेरी किंवा ती, तो अशी भाषा न वापरता त्यांचा आदराने उल्लेख करा. म्हणजे 'काय ही हल्लीची मुलं, यांना वडील माणसांविषयी आदरच नाही, कोणाबद्दल कसं बोलावं हे या मुलांना कळतच नाही !' असं निदान तुमच्या मुलांविषयी तुम्हाला ऐकून घ्यावं लागणार नाही.

पाल्याला शिस्त जरूर लावा. शाळेतून आल्यानंतर चप्पल/बूट नीट ठेवणं, दप्तर जाग्यावर ठेवणं इ. गोष्टी ते करतात ना कटाक्षानं पहा, पण त्याबरोबर तुम्हीही शिस्त पाळता ना हेही पाहिलं पाहिजे. बाहेरून आल्यानंतर तुमची पर्स दिवाणखान्यातल्या खुर्चीवर किंवा जेवणाच्या टेबलावर रहात नाही ना हे पहाणं अत्यावश्यक असतं. मुलांना रागवावं लगातच, पण एकसारखं रागवून चालत नाही. समजावून सांगण्याचा परिणाम रागावण्यापेक्षा अधिक चांगला होतो. शारीरिक वेदना होतील अशी शिक्षा शक्य तर करू नये.

आपल्या पाल्यावर विश्वास हवाच; पण काही वयापर्यंत आपल्या या विश्वासाची अधून मधून चाचणी घ्यावी. दहावीला गुणवत्ता यादीत आलेल्या एका पाल्याने नामवंत महाविद्यालयात शास्त्र शाखेला प्रवेश घेतला. पहिले दोन-तीन महिने तो नियमितपणे येत असे, पण नंतर तो सलगपणे गैरहजर राहिला. महाविद्यालयीन प्रशासनाकडून यासंदर्भात त्याच्या पालकांना दोन पत्रे पाठविली, पण बहुधा ती त्यांच्यापर्यंत पोचली नसावीत. अखेर प्रत्यक्ष घरी जाऊन पत्र दिले. त्याचे पालक संतापाने लाल होऊनच कॉलेजमध्ये आले. सदर पत्र ज्यांच्या सहीचे होते त्या प्राध्यापकाकडे जाऊन हे पत्र तुम्ही लिहिलेच कसे? रोज जादा तास असतात म्हणून माझा मुलगा सकाळी ९.३० वाजताच घरांतून कॉलेजसाठी बाहेर

पडतो आणि संध्याकाळी जवळजवळ सात वाजता घरी येतो. यावर अगदी शांतपणे त्या प्राध्यापिका बोलू लागल्या –

‘हे पहा तुमच्या मुलाशी आमचे वैर आहे का? मी तुमच्याबरोबर एकजण देते. त्यांच्याबरोबर जाऊन तुम्ही तुमचा मुलगा वर्ग, प्रयोगशाळा, ग्रंथालय, जिमखाना, अगदी कॉलेजच्या कॅन्टिनमध्ये आहे कां ते पाहून खात्री करून या.’ काही वेळाने ते पालक खाली मान घालून आले होते. पण मुलानं आपल्या विश्वासाला तडा दिला या विचारानं अस्वस्थ होऊन संतापले होते. रागातच ते म्हणाले, ‘‘आता घरी जाऊन काठीनं त्याला झोडपूनच काढतो.’’

अहो, असं काही करू नका. मुलाला म्हणा, ‘तुझ्या कॉलेजजवळ राहणाऱ्या माझ्या मित्राकडे गेलो होतो. तुमचं कॉलेज पहावं, तुलाही भेटावं म्हणून कॉलेजमध्ये मी आलो होतो. सगळीकडं पाहिलं, पण तू कुठंच भेटला नाहीस. आज तू लौकर घरी आला होतास का? हा माझा मित्र वकील आहे. आपल्या शेताच्या कामासाठी त्याच्याकडे मला वरचेवर जावं लागेलच. त्यामुळे अधूनमधून मला तुलाही कॉलेजमध्ये येऊन भेटता येईल.’ असं काहीसं त्याला सांगा.

या बोलण्याचा बरोबर उपयोग झाला. वेळेवर तो चुकीच्या मार्गावरून परतला आणि पुढे उत्तम गुण मिळवून अभियांत्रिकी कॉलेजला गेला. म्हणजेच पालकांचा पाल्यावर विश्वास हवा पण टोकाचा फाजील विश्वास असू नये. सहजपणे बोलून मुलांशी संवाद साधत राहिलं पाहिजे.

स्त्री–पुरुष समानता ही घरांतूनच शिकवली गेली पाहिजे. ही समानता आई–वडिलांच्या वागण्यांतून प्रतित झाली पाहिजे. मला एक सत्य घटना सांगावीशी वाटते. पाठोपाठच्या तीन बहिणी आणि सर्वात धाकटा भाऊ स्त्री–पुरुष समानतेवर खाजगीत गप्पा मारताना तीन बहिणीतील एक बहिण पोटतिडकीने बोलत होती. एकाच आईची मुलं, पण घरांत अगदी जेवणापासून ते प्रत्येक जिन्नस त्यांतल्या त्यात ताजे पौष्टिक पदार्थ मुलाला जास्त वाढणं आणि मुलीला कमी वाढणं असं केलं जातं. घरात पाहुणे येणार असतील तर हे कर, ते कर असे हुकूम आम्हा बहिणींना सोडले जतात. पण भावाला इकडची काडी तिकडं करायला सांगितली जात नाही. असं प्रत्येक घरांत होत असेलच असं नाही, पण कांही घरांत आजही अशा गोष्टी घडतात.

मुलांना लहानपणापासून स्वतःचं काम स्वतः करणं शिकवलं पाहिजे. दूध किंवा चहा पिऊन झाल्यानंतर खरं तर येईल तसा कप त्याचा त्यानं धुतला पाहिजे, किमान आपला कप बेसिनमध्ये नेऊन ठेवला पाहिजे. आत्तापर्यंत अनेक वेळा उल्लेख केल्याप्रमाणे कांही ठराविक वयापर्यंत मुलांशी संवाद साधलाच पाहिजे. त्यांचे दैनंदिन वेळापत्रक, शाळा–कॉलेजमधील घटना याविषयी आवर्जून संवाद साधलाच पाहिजे. विशेषतः १५–१६ वयापासून मुलं घराबाहेर पडताना व घरी आल्यानंतर त्यांची देहबोली तुमच्याशी बोलणं याबाबत विशेष लक्ष दिलं पाहिजे.

अगदी अलिकडे मी एक दोन घटना अशा वाचल्या, कॉलेजमध्ये नुकता प्रवेश घेतलेली मुलगी ओळखपत्र काढण्याच्या निमित्ताने तिची एका तरुणाशी ओळख होते. सुरुवातीला तो तिला मतदही करतो, पण पुढे मदतीच्या बहाण्याने तिला अनोळखी ठिकाणी नेऊन तिच्यावर अत्याचार करतो. पाठोपाठ त्याच्या मित्राशी झालेल्या ओळखीतून त्या मित्राकडूनही ती अत्याचाराचा बळी ठरते. या मुलीच्या/तरुणींच्या घरातील दैनंदिन वागण्यांत, तिच्या बोलण्यांत, देहबोलीत निश्चितच फरक पडला असणार. हा फरक तिच्या पालकांच्या लक्षांत यायला नको होता का? कदाचित रोज तेही कामावर जात असतील. त्या गडबडीत लक्षात आलं नसेल, पण किमान आठवडा–पंधरा दिवसांनी मिळणाऱ्या सुटीदिवशी तरी कांहीतरी वेगळेपणा जाणवायला पाहिजे होता ना? म्हणजे पुन्हा तेच. मुलांना वेळ देणं, त्यांच्याशी संवाद साधणं म्हणजे पालकत्वाची एक अत्यावश्यक गरज आहे.

मुलांचे लाड करा, त्यांनी मिळवलेल्या यशाचं कौतुक करा, पण तेही मर्यादेतच पाहिजे. अति कौतुकाने मुलं शेफारणार नाहीत, आपण म्हणजे कांहीतरी वेगळे हा अहंपणा त्यांच्यात निर्माण होणार नाही याची काळजी घेणे अत्यावश्यक आहे. यश आणि अपयश दोन्ही पचवता आलं पाहिजे. आपला पाल्य एखाद्या क्षेत्रात कमी असेल तर त्याची तुलना कधीही दुसऱ्या मुलाशी करू नका. तुला हे येत नाही, ते जमत नाही असे ताशेरे ओढत आपल्या मुलांत काय नाही, त्याला काय जमत नाही, याऐवजी आपल्या मुलाला काय जमतं, त्याच्यात कोणते गुण आहेत याचा शोध घ्या. त्याच्या अपयशात त्याच्या/तिच्या पाठीशी उभे राहून धीर द्या आणि आपण नेमके कुठं कमी पडलो, आपल्या हातून नेमकी काय चूक झाली या गोष्टीचा शोध घेण्यास प्रवृत्त करणे अत्यंत महत्त्वाचे आणि आवश्यक असते. ज्यायोगे आत्मविश्वासाने त्याची यशाकडे वाटचाल सुरू होते.

अपयशाइतकीच पाल्याला नकाराला सामोरे जाता आले पाहिजे. वस्तू मागितली की लगेच देणं हे चूकच. नोकरी किंवा व्यवसाय करत नसाल तर इतर कामासाठी बाहेर पडताना आपण कुठे जात आहोत आणि परत येण्यास साधारण किती वेळ लागेल हे सांगितले पाहिजे. म्हणजे पाल्यानाही ती सवय आपोआपच लागेल. बऱ्याच वेळ तातडीचं काम आठवून स्कूटरला किक मारून आपण कुठे जात आहोत याची कल्पना न देता आई बाहेर पडते. साहजिकच पाल्यानाही तीच सवय लागते. म्हणजे मुलांना कोणत्याही बाबतीत शिस्त लावताना पालक म्हणून तुम्ही स्वत: शिस्तपालन केलं पाहिजे.

तुमच्यातील मतभेद, भांडणं मुलांसमोर होणार नाहीत याची काळजी घेतलीच पाहिजे. घरातील वडील माणसाबरोबरचं वागणं, त्यांच्याशी तुमचं बोलणं हे निश्चितच संयमित असलं पाहिजे. तसेच नातेवाईकांबाबतही कदाचित तुमच्या मनात गैरसमजाची जळमटं असतील, त्याचं शब्दावाटे प्रकटीकरण पाल्यासमोर होणार नाही याची काळजी घेतली पाहिजे. कोण नातेवाईक कसे आहेत हे मुलांना त्याच्या अनुभवातून ठरवू द्या. कोणत्याही वयोगटातल्या व्यक्तीला आपलं एक प्रकारे व्यसन लावणाऱ्या टी.व्ही. आणि मोबाईल फोन यांपासून योग्य अंतर आणि त्यांचा सुयोग्य वापर पालकांनीच ठेवला पाहिजे. याविषयी सविस्तर विचार यापूर्वीच्या लेखांत मांडले आहेत. कोणत्याही गोष्टीची, कार्यक्रमाची, समारंभाची वेळ पाळण्याची सवय ही घरातूनच लागली पाहिजे. त्यासाठी पालक जागरूक असतील तर आपोआप लहानपणापासून पाल्यही जागरूक राहतात.

अशा अनेक लहानमोठ्या गोष्टी पालक आपल्या परीने करतच असतात. पण सर्वात महत्त्वाचे म्हणजे आपल्या मुलांशी तुम्ही अनेक बाबतीत बोलले तर पाहिजेच. पण मुलांनाही बोलते केले पाहिजे. मुलांवर एकसारखं, लहान सहान गोष्टींवरून न रागावता आपलं विसरून गेलेलं बालपण आठवा. मूल होऊन तुमच्या मुलाच्या मनात डोकावा. त्याच्या शाळेतल्या, त्याच्या मित्र-मैत्रिणींच्या गमती-जमती ऐकण्यासाठी वेळ काढा. आपलं वय विसरून त्याच्या वयाला साजेसे खेळ खेळा. मुलगी असेल तर काही क्षणांच्या खेळासाठी तिला आई होऊ दे आणि तुम्ही तिचं बाळ व्हा. या खेळण्यातून आई म्हणून, पालक म्हणून तुम्ही कशा वागता याचं प्रतिबिंब तुमच्या मुलीच्या वागण्या-बोलण्यातून दिसेल. मुलांना छोट्याशा गोष्टी सांगणं, गोष्टीचं पुस्तक वाचून दाखवणं यांसारख्या कृतीतून मुलं विचार करायला लागतात. त्याचं म्हणणं नीट ऐकून घ्या. त्यांना काय कळतंय असं म्हणत त्यांच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करू नका.

एकदा माझ्या नातीला मी वासुदेव -देवकीची गोष्ट सांगत होते. सर्व गोष्ट तिने अगदी काळजीपूर्वक ऐकली आणि गोष्ट संपल्यावर तिनं मला विचारलं, आजी वसुदेव-देवकीचं आठवं मूल कंसाला मारणार होतं हे त्याला माहीत असूनही त्यानं

त्या दोघांना एकत्रच राहू दिलं नसतं तर किती बरं झालं असतं ना?

यावर माझ्या परीने मी तिला खुलासा दिला पण तिचा विचारही चूक नव्हता हे मी मनोमन जाणलं.

मुलांकडून झालेल्या चुका त्यांना पुन्हा पुन्हा सांगून नाउमेद न करता त्यांना चुका टाळायला मदत करा. आपण काम करताना मुलांच्यावर छोट्या मोठ्या कामाच्या जबाबदाऱ्या टाकून त्यांच्याबरोबर सुसंवाद आणि सहभाग वाढवला पाहिजे. तू हे कर, ते कर अशा आज्ञा सोडण्याऐवजी 'चला आपण करू या' हा मंत्र जपावा. तुमच्या सहवासातून मिळणारा आश्वासक आधार मुलांच्या पुढच्या आयुष्याची शिदोरी असते.

हे सारं करताना एक लक्षांत ठेवलं पाहिजे, मुलांच्या पंखात आणि मनाला बळ आणि आधार देण्याचं, त्यांना आत्मभान येऊन त्यांचं मानसिक बळ वाढविण्याचं काम पालकांचं. पण आकाशात भरारी त्यांची त्यांनीच घ्यायची आहे हे विसरून चालणार नाही.

**– कमल हर्डीकर,**

मोबा. ९६८९३६९९२६, ९४२०४५८४२५



# नवस्नेहचे माजी संपादक प्रा. डॉ. चंद्रकांत जोशी याचे दुःखद निधन

आपल्या नवस्नेह मासिकाचे प्रथम संपादक प्रा. डॉ. चंद्रकांत जनार्दन जोशी यांचे नुकतेच दि. २५ जुलै २०२६ रोजी कोल्हापूर येथे दुःखद निधन झाले. ते ७६ वर्षांचे होते. अर्थशास्त्र विषयाचे प्राध्यापक असलेले डॉ. जोशी न्यू कॉलेज, कोल्हापूर, भोगावती महाविद्यालय, कुरुकली, महावीर महाविद्यालय, कोल्हापूर तसेच वाणिज्य व व्यवस्थापन विभाग, शिवाजी विद्यापीठ असे सुमारे ३५ वर्षे अध्यापनाचे काम करीत होते.

महावीर महाविद्यालय, कोल्हापूर येथे ३० वर्षे वाणिज्य विभाग प्रमुख पदावर कार्य करून ते निवृत्त झाले.

शिवाजी विद्यापीठात स्वतंत्र वाणिज्य विभाग स्थापनेत त्यांची अग्रणी भूमिका होती. अर्थशास्त्र विषयांतर्गत 'पश्चिम महाराष्ट्रातील सहकारी साखर कारखानदारी' या विषयावर त्यांनी शिवाजी विद्यापीठा कडून डॉक्टरेट मिळविली होती. त्यांनी वाणिज्य, व्यवस्थापन, विमाशास्त्र, लेखाशास्त्र, सहकार, उद्येजकता विकास, विक्री व्यवस्थापन, औद्योगिक व्यवस्थापन, व्यवसाय विषयक कायदे अशा विविध विषयांवरील फडके प्रकाशन, कोल्हापूर, हिमालय पब्लिकेशन्स, पुणे आणि शेठ प्रकाशन, मुंबई या लोकप्रिय प्रकाशनाद्वारे प्रकाशित १५० हून अधिक पुस्तके लिहिली आहेत. अजब पब्लिकेशन्स यांचेतर्फे त्यांचा 'कथातरंग' हा कथा संग्रहही प्रकाशित झाला असून नवस्नेह मासिकासह इतर अनेक धार्मिक पत्रिका, दिवाळी अंक यांतून धर्म, संत वाङ्मय, योग, ध्यान, प्राणायाम, बाल शिक्षण आदी विषयांवर त्यांचे विस्तृत लेखन प्रसिद्ध झाले आहे.

लक्ष्मी केशव सेवा ट्रस्ट या स्वत: स्थापन केलेल्या ट्रस्टद्वारे गांधीनगर येथे यांनी सिद्धीविनायक मंदिराची स्थापना केली. त्या परिसरातील अत्यल्प उत्पन्न गटातील लहान मुलांसाठी बालवाडी स्थापून त्यांच्या मोफत शिक्षणाची सोय तसेच विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचा पुरवठा असे उपक्रम ते नियमित चालवित असत. चित्पावन संघ, कोल्हापूर द्वारे शैक्षणिक क्षेत्रातील कार्यासाठी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पुरस्कारांच्या कार्यक्रमाची संकल्पना व रूपरेषा निर्मितीमध्ये त्यांचा मोठा सहभाग होता.

आम्ही प्रा. डॉ. जोशींच्या स्मृतीस कोल्हापूर चित्पावन संघातर्फे विनम्र आदरांजली अर्पण करतो!

# काळ मोजणारे मंदिर

घड्याळाचा शोध लागण्याच्या कित्येक शतकं आधी, अंतराळात डोकावणाऱ्या दुर्बिणी तयार होण्याच्याही आधी, इतकंच काय, युरोपला एक वर्ष ३६५ आणि सव्वा दिवसांचं असतं हे कळण्याच्याही फार आधी, भारताच्या दक्षिण टोकावर, जिथे समुद्र आणि आकाश एकमेकांना भेटतात, तिथे एका महान आश्चर्यकारक मंदिराचा उदय झाला. ते म्हणजे पद्मनाभस्वामी मंदिर !

अनंत नावाच्या नागावर चिरनिद्रेत पहुडलेल्या त्या प्रभूचे मंदिर ! ते केवळ भक्तीचे ठिकाण नाही; ते दगडात कोरलेले एक महान टाइम मशीन आहे!

**भाग १ : दिवस मोजणारे खांब**

मंदिराच्या लांबलचक कॉरिडॉरमध्ये प्रवेश करा आणि पहा. तुमच्या समोर ३६५ खांब दिमाखात उभे आहेत. ते बोलत नाहीत. रोज सकाळी जेव्हा पूर्वेला सूर्य उगवतो, तेव्हा त्याचा प्रकाश पूर्वेकडील प्रवेशद्वारातून आत येतो आणि दररोज एका खांबाला स्पर्श करतो. एका दिवसाला एक खांब, असे ते खांब वर्षाचे ३६५ दिवस मोजतात. पण, तिथे एक 'सव्वा खांब' आहे. तो अगदी लहान आहे, लपलेला आहे. तीन वर्षे तो खांब सावलीतच राहतो. पण केवळ चौथ्या वर्षी, म्हणजेच लीप वर्षात, सूर्याची किरणे त्या खांबाला पूर्णपणे प्रकाशमान करतात. एक हजार वर्षांपूर्वीच आपल्या पूर्वजांनी दगडात गणित करून ठेवले होते की सौर वर्ष केवळ ३६५ दिवसांचे नाही, तर त्यात अतिरिक्त ६ तास आहेत!

**भाग २ : प्रभूच्या चरणांना स्पर्श करणारा सूर्य**

वर्षातून दोनदा सूर्य एक चमत्कार घडवतो.

- **२२ डिसेंबर (हिवाळी संक्रांती) :** सूर्याची किरणे गर्भगृहात प्रवेश करतात आणि पहुडलेल्या पेरुमलच्या डाव्या पायावर पडतात.
- **२१ जून (उन्हाळी संक्रांती) :** तोच सूर्यप्रकाश सरकतो आणि पेरुमलच्या उजव्या पायाला स्पर्श करतो.
- **विषू (संपात दिन) :** ज्या दिवशी दिवस आणि रात्र समान असतात, त्या दिवशी सूर्यप्रकाश पेरुमलच्या अंगठ्यावर पडतो – ना डावीकडे, ना उजवीकडे, अगदी मध्यभागी!

यासाठी किती अचूक गणित लागले असेल याचा विचार करा. ही केवळ भक्ती नाही; ही स्थलाकृति आणि खगोलशास्त्राच्या विज्ञानाची सर्वोच्च पातळी आहे!

**भाग ३ : दरवाजे नसलेल्या ४९ खिडक्या**

मंदिराच्या गोपुराकडे पहा. त्याला सात मजले आहेत. आपल्या पूर्वजांनी त्याची रचना पर्वतासारखी केली आहे. तो तुमच्या मणक्याचा नकाशा आहे! जे खाली आहे ते मूलाधार आहे, जे वर आहे ते सहस्रार आहे. या सात मजल्यांवर, प्रत्येक मजल्यावर सात खिडक्या, अशा एकूण एकोणपन्नास खिडक्या आहेत. पण या खिडक्यांना दरवाजे नाहीत, पडदे नाहीत, काच नाही. त्या नेहमी उघड्याच असतात. यामागचे तत्त्वज्ञान काय आहे?

जेव्हा मनुष्य ज्ञानामध्ये जागृत होतो, तेव्हा त्याच्या संवेदनांचे दरवाजे (४९ दरवाजे) दरवाज्यां–शिवाय उघडे असले पाहिजेत. काहीही अडवले जाऊ नये, काहीही नाकारले जाऊ नये. संपूर्ण जग जसे आहे तसे स्वागत करणारी ही एक जागरूकता आहे.

**भाग ४ : पावसातही न भिजणारे गर्भगृह**

केरळमध्ये मुसळधार पाऊस पडतो तेव्हा वारा जोरात वाहतो. गोपुरातील सर्व एकोणपन्नास खिडक्या उघड्या असूनही, पाण्याचा एक थेंबही गर्भगृहात प्रवेश करत नाही! हे कसे शक्य आहे? मंदिराची रचना तशी आहे. बाहेरील हवा आणि आतील हवा यांच्यात दाबाचा फरक निर्माण करून, आपल्या पूर्वजांनी 'व्हॅक्यूम बॅरियर' तयार केले. ते पावसाला आत येऊ देत नाही.

**आतील रहस्य :** बाहेरच्या जगात कितीही संघर्षाचा पाऊस पडला तरी, तुमच्या आतले 'चित्सभा' (गर्भगृह) नेहमीच कोरडे आणि शांत राहिले पाहिजे – हेच हे मंदिर शिकवते.

# फडके साहेब

'फडके प्रकाशन' ही महाराष्ट्रातील अग्रगण्य शैक्षणिक प्रकाशन संस्था आहे. साधारण चाळीस वर्षांपूर्वी श्री. मोरेश्वर फडके यांनी कोल्हापुरात पुस्तक विक्रीचा छोटासा व्यवसाय सुरू केला. सदर पुस्तकांना विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद मिळाला. आजपर्यंत संस्थेमार्फत हजारो पुस्तके प्रकाशित झाली, होत आहेत. महाराष्ट्रीय कानोकोपऱ्यातील प्रत्येक महाविद्यालयाच्या ग्रंथालयात फडके प्रकाशनची पुस्तके पोहोचली आहेत. दूरदृष्टी, चिकाटी, मेहनत व व्यवसायातील प्रामाणिकपणा या गुणांच्या बळावर मोरेश्वर फडके यांनी हे यश खेचून आणले. त्यांनी विविध विषयातील पुस्तके लेखकांच्याकडून लिहून घेतली. स्वत: प्रत्येक गोष्टीत लक्ष घालून प्रकाशित केली. ते नेहमी म्हणायचे, विद्यार्थ्यांना जास्तीत जास्त सकस वाङ्मय कमीत कमी किंमतीत उपलब्ध झाले पाहिजे. त्यामुळे विद्वान लेखकांनी लिहिलेली, दर्जेदार कागद, उत्कृष्ट छपाई व योग्य किंमत यांच्या जोरावर अल्पावधीत फडके प्रकाशनची पुस्तके विद्यार्थी वर्गात लोकप्रिय झाली.

कोल्हापुरातील मुद्रण व्यवसायात फडके साहेबांना आदराचे स्थान होते. दर्जेदार छपाईवर त्यांचा कटाक्ष असायचा. कोल्हापुरातील अनेक प्रेसमध्ये फडके प्रकाशनच्या पुस्तकांच्या छपाईचे काम चालते. प्रेस मालकही स्वत: लक्ष घालून दर्जेदार छपाई करून घेतात.

फडके साहेब स्वत: अतिशय शिस्तप्रिय होते. संस्थेतील सर्वांना त्यांचा आदरयुक्त धाक असायचा. संस्थेतील सर्वांशी त्यांचे अतिशय जिव्हाळ्याचे संबंध होते. अनेकांना त्यांनी अडिअडचणीच्या वेळी आर्थिक मदत केली. एकदा प्रेसमध्ये काम करणाऱ्या काही कामगारांनी स्वत:चा प्रेस व बुक बायडिंग व्यवसाय सुरू करण्याची इच्छा साहेबांना बोलून दाखवली. त्यासाठी पडतील ते कष्ट घेण्याची त्यांनी तयारी दाखवली. त्यांची इच्छा व कष्ट करण्याची तयारी पाहून साहेबांनी त्यांना स्वत:चा व्यवसाय सुरू करण्यासाठी भरीव आर्थिक मदत केली. तसेच कामाची हमीही दिली. त्यामुळे कालचा प्रेस कामगार आज प्रेसमालक बनला. हे फक्त साहेबांच्या सहकार्यामुळे झाले हे ते आजही बोलून दाखवितात.

संस्थेत काम करणाऱ्या अनेकांना त्यांनी त्यांची गरज पाहून आर्थिक मदत केली. कित्येकांना मुला-मुलींच्या लग्नासाठी, शिक्षणासाठी, काही जणांना औषधोपचारासाठी त्यांनी मदत केली. भागातील अनेक मंडळांचे साहेबांसोबत आपुलकीचे संबंध होते. शिवजयंती, गणेशोत्सव वगैरे कुठल्याही सामाजिक कार्याक्रमासाठी ते सढळ हाताने मदत करायचे.

साधारण ३५ वर्षांपूर्वी मी कामाच्या शोधात कोल्हापूरला आलो. कारण दुष्काळी असलेल्या बीड जिल्ह्याचा मी रहिवासी. कामासाठी साहेबांना भेटलो. नोकरीसाठी अर्ज, शैक्षणिक कागदपत्रे त्यांना दाखवली. माझी अडचण व नोकरीची अत्यंत निकड असल्याचे त्यांना सांगितले. त्यांनी शांतपणे ऐकून घेतले व लगेच उद्यापासून कामावर या असे सांगितले. शैक्षणिक प्रकाशन संस्थांच्या माध्यमातून विद्येच्या मंदिरात काम करण्याची संधी मिळाली याचा मलाही मनस्वी आनंद झाला. कुणाच्या शिफारशीशिवाय केवळ माझी अडचण व गरज लक्षात घेऊन त्यांनी मला नोकरी दिली. काम करण्याची पद्धत मला समजावून सांगितली. मला स्वत:ला कुठलाही अनुभव नसताना त्यांनी सांगितल्याप्रमाणे काम करत गेलो. अनेक वेळेस चुका झाल्यावर बोलणी खाल्ली, पण चांगले काम झाल्यावर पाठीवर शाबासकीची थापही मिळाली.

काही वर्षांनंतर साहेब म्हणाले 'आता पुन्हा गावाकडे परत जाऊ नका. कोल्हापुरात एखादे छोटेसे घर बघा व कोल्हापूरकर व्हा.' स्वत:चे घर कोल्हापुरात घेण्याची मी कल्पनाही केली नव्हती. पण हे साकार झाले फक्त साहेबांच्यामुळे. त्यांनी मला 'जागा पहात रहा' असे सांगितले. त्यांच्याच पाहण्यात एक जागा आली. त्यांनी मला पाहण्यास सांगितले. किंमत मला परवडणारी नव्हतीच, पण 'ॲडव्हान्सची रक्कम मी देतो, बाकी बँकेचे कर्ज प्रकरण करू' असे साहेबांनी सांगितले.

कुठल्याही बँकेत कर्ज काढण्यासाठी परतफेडीची हमी व त्यासाठी जामीनदार हवे असतात. माझेतर बँकेत साधे खातेही नव्हते. साहेबांच्याच ओळखीने मला एका बँकेने कर्ज देवू केले. दूरवरून आलेल्या एका

कामगाराला लाख रुपयाचा जामीन कोण देणार? जामिनासंबंधी कुणाला विचारायची हिंमत नव्हती, नकार येणार याची खात्री होतीच. बँकेच्या कर्ज प्रकरणाचे फॉर्म आणले. फॉर्म भरताना जामीनदार म्हणून साहेबांनी स्वत:चे नाव टाकले, सही केली. ही त्यांच्या मोठेपणाची प्रचिती होती. यथावकाश बँकेने कर्ज मंजूर केले. मला स्वत:चे घर मिळाले. बँकेने दिलेल्या मुदतीत मीही कर्जफेड केली आणि मी कोल्हापूरकर झालो. याचे सर्व श्रेय फक्त फडके साहेबांनाच द्यावे लागेल.

अशा सर्वांना मादतीचा हात देणाऱ्या, स्वत:च्या पायावर उभे राहण्याचे बळ देणाऱ्या, सर्वांचा आवडता देवमाणूस असणाऱ्या साहेबांना दि. २७ नोव्हेंबर २०२३ रोजी देवाज्ञा झाली. आज साहेब शरीराने आमच्यात नसले तरी प्रत्येकाच्या ह्रदयात त्यांचे स्थान अढळ आहे!

**– प्रकाश भा. हजारे,**
मोबा. ९३२५०८९४९८

# मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा !

**(लेखांक नऊ)**

आजचा प्रवास थोडा उशिरा सुरू झाला कारण काल हवामान बिघडले असल्यामुळे केदारनाथ येथून हेलिकॉप्टर उड्डाण करू शकले नाही. त्यामुळे माझे सहप्रवासी येऊ शकले नाहीत. ते नऊ वाजता आल्यावर सर्वानी एकत्रितपणे नाश्ता केला व अकरा वाजता बद्रिनाथच्या दिशेने निघालो. सोनप्रयाग ते बद्रिनाथ हे अंतर अंदाजे २२५ किलोमीटर आहे, त्यामुळे आजचा पूर्ण दिवस प्रवास करायचा होता. निघाल्यावर तीन तासाच्या प्रवासा नंतर आम्ही चोपता गावाजवळ पोहोचलो व तिथेच एका छोट्या टेकडीवर थांबून आमच्या जवळील जेवणाचा आस्वाद घेतला. दुपारी दोन वाजता तुंगनाथच्या पायथ्याशी पोहोचलो.

दुपारी अडीच वाजता तुंगनाथ चढायला सुरुवात केली व एक तासात वरती पोहोचलो. चार किलोमीटरची खडी आणि दमछाक करणारी चढाई आहे तरीही सह्याद्रीत बागडणाऱ्यांना त्याची काळजी वाटत नाही. सह्याद्री हिमालयाचा लहान भाऊ त्यामुळे आमच्यासारख्या सह्याद्रीच्या लेकरांना हिमालय सुद्धा लहान भावाच्या मुलासारखी आपुलकीची मायेची सावली देतो. वरती चढताना दिपाली भोसले (मुंबई येथे राहणारी व मला गड भ्रमंती दरम्यान सह्याद्रीमध्ये भेटलेली) माझ्या सारखीच गडप्रेमी बहीण भेटली. तुंगनाथ हे ठिकाण केदारनाथ पेक्षा उंचावर आहे पण इथे वरपर्यंत गाडी जाते व शेवटाचा २५ टक्के भाग पायी चढावा लागतो. यात्रेकरुंच्या सुविधेसाठी घोड्याच्या पाठीवरून जायची पण व्यवस्था आहे. वरती मनाला मोहित करणारा निसर्ग आहे. या मोसमात बर्फ जरी नसला तरी धुके होते व मधून मधून पावसाचे थेंब पडत होते. या ठिकाणी पंच केदार व पार्वती माता मंदिर आहे. केदारनाथ येथे महादेवचा पाठीचा भाग, रुद्रनाथ येथे जटा, माध्यमेश्वर येथे मध्यभाग, कल्पेश्वर येथे मुख व तुंगनाथ येथे ह्रदय आहे असे मानले जाते. ह्या मंदिरा पासून एक ते दीड किलोमीटर अंतरावर चंद्रशीला नावाचे पावित्र व निसर्गरम्य ठिकाण आहे.

तुंगनाथ येथून सहा वाजता खाली उतरलो व आम्ही सर्वजण बद्रिनाथच्या दिशेने निघालो. बद्रिनाथ अजून बरेच अंतर दूर असल्यामुळे आज बद्रिनाथ येथे न जाता पिपलकोटी येथे मुक्काम केला. पिपलकोटी हे गाव बद्रिनाथ पासून पंच्याहत्तर किलोमीटर दूर आहे. रात्री थंडी होती. त्यामुळे स्वैपाक करून गरमागरम जेवण केले व लवकर झोपी गेलो.

**– ओंकार गाडगीळ,**
मोबा. ९८२२८७६९२२

## ।। अवीट गोडीचे श्रीरामायण ।।

# सावळा गं रामचंद्र

सावळा गं रामचंद्र माझ्या मांडीवर न्हातो
अष्टगंधाचा सुवास निळ्या कमळांना येतो ।।१।।

सावळा गं रामचंद्र माझ्या हातांनी जेवतो
उरलेल्या घासासाठी थवा राघूंचा थांबतो ।।२।।

सावळा गं रामचंद्र रत्नमंचकी झोपतो
त्याला पाहता लाजून चंद्र आभाळी लोपतो ।।३।।

सावळा गं रामचंद्र चार भावात खेळतो
हिरकांच्या मेळाव्यात नीलमणी उजळतो ।।४।।

सावळा गं रामचंद्र करी भावंडांसी प्रीत
थोराथोरांनी शिकावी बाळाची या बाळरीत ।।५।।

सावळा गं रामचंद्र त्याचे अनुज हे तीन
माझ्या भाग्याच्या श्लोकाचे चार अखंड
चरण ।।६।।

सावळा गं रामचंद्र करी बोबडे भाषण
त्याशी करिता संवाद झालो बोबडे भाषण ।।७।।

सावळा गं रामचंद्र करी बोबडे हे घर
वेद म्हणता विप्रांचे येती बोबडे उच्चार ।।८।।

सावळा गं रामचंद्र चंद्र नभीचा मागतो
रात जागवितो बाई सारा प्रासाद जगतो ।।९।।

सावळा गं रामचंद्र उद्या होईल तरुण
मग पुरता वर्षेल देवकृपेचा वरूण ।।१०।।

घरात छोटं बाळ असणं म्हणजे स्वर्गसुख. आणि ते बाळ प्रत्यक्ष प्रभू रामचंद्र असणं म्हणजे तर अनुपमेयच. छोट्या रामाच्या बाल लीलांचे वर्णन या गीतात गदिमा किती सुंदर पद्धतीने करतात पहा ! त्या बाळाला निळ्या कमळाची उपमा ते देतात. रामाचा उरलेला घास खाण्यासाठी राघूंचा थवा वाट पहातोय. त्याचे बोबडे बोल ऐकून सगळं घर बोबडं झालंच आहे, पण यज्ञ करणारे ब्राह्मण ही बोबडे मंत्र म्हणू लागलेत. किती सुंदर कल्पना! रामाला रात्री झोपलेला पाहून चंद्रही ढगात लपतो !

ही चार भावंडे म्हणजे जणू चार हिरेच, परंतु यात राम मात्र नीलमण्याप्रमाणे उजळतोय. वा! किती सुंदर! या चार भावंडांचे एकमेकांवरचे प्रेम हे आदर्शवत प्रेम आहे. कौसल्या म्हणते आहे की ही चार भावंडे म्हणजे माझ्या भाग्याच्या श्लोकाचे चार अखंड चरणच आहेत. आता सर्वजण वाट पहात आहेत, ही चार बाळे उद्या मोठी होतील, आदर्शवत असे रामराज्य येईल !

गीत रामायणाचे वैशिष्ट्य म्हणजे गदिमा आपल्याला त्या काळात घेऊन जातात. आपण अशी कल्पना केली तर आपण खरंच त्या काळात जातो, एवढी गदिमांच्या शब्दात ताकद आहे.

**– सुधीर दाजी जोशी,**
९८२२२९८७२६

## संघाचा दिवाळी वधूवर विशेषांक ऐन दिवाळीत प्रसिद्ध होणार ! विजयादशमीपर्यंत नाव नोंदणी करा...!

कव्हर पान 3 वरून पुढे...

पाठवावा. फोटोखाली नाव लिहावे. फोटो पाठवताना तो स्वच्छ आणि व्यवस्थित पाठवावा. अस्वच्छ अथवा डाऊनलोड न झाल्यास फोटो येणार नाही, फक्त माहिती दिली जाईल याची नोंद घ्यावी. ई–मेल केल्यावर मुख्यालयात 0231 – 2621001 या नंबरवर सकाळी 11 ते सायंकाळी 6 पर्यंत कळवावे.

- नेटबँकिंग पेमेंट – ज्या शहरात पंचरत्नची शाखा नाही आणि ज्या वधूवरांना नेटवरून फॉर्म व फोटो पाठवायचे आहेत त्यांनी नेटबँकिंग मार्फत रक्कम भरून नाव नोंदणी करावी. त्यासाठी आयडीबीआय बँकेत 'पंचरत्न वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर' या नावे चालू खाते क्र. 463102000006248 या खात्यावर आपले पैसे जमा करावेत. (IFSC : IBKL0000463)
- फोटो व माहिती द्यावयाची असेल त्यांनी रु. 500/– वर दिलेल्या बँक खात्यात भरावेत.
- रक्कम भरल्यावर मुख्यालयात रक्कम भरल्याची तारीख कळवावी.

**आजच नाव नोंदणी करा आणि ऐन दिवाळीत विवाह योग जुळवून आणा.**

**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स

**सराफी दुकान**

सोमवार, दि. ५ : पुष्य नक्षत्र
मंगळवार, दि. २० : दसरा

आपलं दुकान
महाद्वार रोडवर
0231–2546585

## दुःखद निधन



सातारा शहरातील ज्येष्ठ पत्रकार, अभ्यासक, लेखक, ब्राह्मण सभेचे ज्येष्ठ कार्यकर्ते व आपल्या नवस्नेह मासिकाच्या दिवाळी अंकासाठी गेली कित्येक वर्षे उत्तमोत्तम लेख सातत्याने देणारे, नवस्नेह परिवारातील ज्येष्ठ सदस्य व हितचिंतक श्री.मधुकर नेने यांचे दिनांक १०.९.२०२६ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.नवस्नेह परिवार व चित्पावन संघ कोल्हापूर तर्फे त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली ! त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**युनियन बँक ऑफ इंडिया, महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलींची माहिती - ऑक्टोबर २०२६)

| अ. क्र. | वधूचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | अपूर्वा --- | यजुर्वेदी | २०/६/९७ ५.३ | कौडिण्य, वृश्चिक ज्येष्ठा, ४ थे आद्य | B.E. E. & T.C. | टीसीएस बेंगलोर | वा.प्रा. १०.५ लाख | रविंद्र कृष्णराव कुलकर्णी छ.संभाजी नगर. ९८२३१७३४१५ |
| २. | प्रगण्या --- | यजुर्वेदी | ९/१०/९९ ५.३ | भारद्वाज, कन्या हस्त, २ रे आद्य | M.Com. M.B.A. (Finance) | खाजगी नोकरी बडोदा | वा.प्रा. --- | नरेंद्र जोशी बडोदा (गुजरात) ९६६२५११५१९ |
| ३. | श्लोका --- | देशस्थ ऋ. | २८/४/९८ ५.३ | वसिष्ठ, वृषभ कृतिका, ३ रे अंत्य | B.E. | पुणे येथे | वा.प्रा. १५ लाख | श्रीमती स्वातीताई राजेंद्र जोशी, सोलापूर ८४२१८७५६४६ |
| ४. | प्रणोती --- | यजुर्वेदी | २/१/९८ ५.४ | चंद्रात्रे, कन्या चित्रा, २ रे मध्य | B.E. | पुणे येथे | वा.प्रा. ४ लाख | प्रफुल्ल प्रल्हाद चंद्रात्रे नाशिक ७०४०५५७४१२ |
| ५. | मानसी --- | यजुर्वेदी | ४/२/९९ ५.२ | कौशिक, सिंह उ.फाल्गुनी आद्य | B.E. E. & T.C. | पुणे येथे | वा.प्रा. --- | यशवंत रामचंद्र कुलकर्णी नाशिक ८४२१६०७१६५ |
| ६. | मिताली --- | कोकणस्थ | २७/४/९३ ५.३ | विष्णूवृद्ध, मिथुन आर्द्रा, ४ थे आद्य | B.Com. PGDBM in Finance | खाजगी शाळेत क्लार्क | वा.प्रा. --- | किरण देव पेण, रायगड ७०३८९२८८८० |
| ७. | माधुरी | देशस्थ ऋ. | २७/१२/९९ ५.५ | विश्वामित्र, सिंह पूर्वा, २ रे मध्य | B.S.L. LLB, LLM Criminal Law | पुणे येथे | वा.प्रा. --- | अनिलराव व्यंकटेश कुलकर्णी पुणे ९४२३४५७४०८ |
| ८. | भक्ती --- | कोकणस्थ | १७/५/९७ ५.८ | अत्री, सिंह उत्तरा, पहिले आद्य | PG Diploma | टॅलेंड गम (WFH) | वा.प्रा. ५ लाख | मकरंद आठवले नाशिक रोड ८६००४१४९५० |
| ९. | अंकिता --- | देशस्थ ऋ. | २०/१०/९९ ५.४ | जमदग्नी, कुंभ धनिष्ठा, चौथे मध्य | B.Com. C.A. कथ्थक ६ परीक्षा | बेंगलोर येथे | वा.प्रा. १९ लाख | मनोज वामनराव कुलकर्णी बेंगलोर ९८६०१३०३२१ |
| १०. | गौरी --- | यजुर्वेदी | ३/११/९७ ५.० | उपमन्यू, वृश्चिक जेष्ठा, आद्य | M.D. Ayurved | व्यवसाय | वा.प्रा. --- | मिलींद नरहर जोशी नाशिक ८३०८०८९३२० |

**जान्हवी राम पुजारी (घाटे) (देशस्थ ऋ,)** **A +ve**
**जन्मतारीख :** १९/१/२००१ **उंची :** ५.६
**शिक्षण :** M.Com. कथ्थक मध्यमा पूर्ण
**पत्ता : श्री. राम पुजारी (घाटे)**
मु.पो.नरसोबावाडी, जि. कोल्हापूर.
मोबा. 9209040094, 9420075695
**अपेक्षा :** सांगली, सातारा, कोल्हापूर भागातील अनुरूप

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| भारद्वाज | वृश्चिक | अनुराधा | पहिले | मध्य | देव |

**मयुरा अतुल साने (कोकणस्थ)** **B +ve**
**जन्मतारीख :** २/५/१९९९ **उंची :** ५
**शिक्षण :** B.E. Production **नोकरी :** पुणे येथे
**वा. उत्पन्न :** ७,७०,०००/- **अपेक्षा :** अनुरूप
**पत्ता : श्री. अतुल वसंत साने**
शिवप्रसाद संकुल, संभाजीनगर, कोल्हापूर.
मोबा. 9422425235, 9890778567

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| कपि | वृश्चिक | विशाखा | चौथे | अंत्य | राक्षस |

## कोल्हापूर चित्पावन संघ, कोल्हापूर (उपवर मुलांची माहिती - ऑक्टोबर २०२६)

| अ. क्र. | वराचे नांव रक्तगट | पोटशाखा/ प्रथम वर | जन्मतारीख उंची | गोत्र, रास, नक्षत्र, चरण, नाडी, गण | शिक्षण | नोकरी/ व्यवसाय तपशील | मासिक प्राप्ती रु. | पालकांचे नांव व पूर्ण पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सर्वेश --- | कऱ्हाडे | १५/९/८९ ५.७ | अत्री, कुंभ पू.भाद्र, ३ रे आद्य, मनुष्य | M.C.A. | पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ७ लाख | चंद्रशेखर सप्रे विजापूर रोड, कोल्हापूर ९५६१८९८८७२ |
| २. | प्रसन्न --- | देशस्थ ऋ. | २४/९/९६ ५.३ | विश्वामित्र, मकर धनिष्ठा, २ रे मध्य, राक्षस | B.E. Mech. | टी.सी.एस. पुणे येथे | वा.प्रा. ८ लाख | प्रकाश प्रल्हाद बिलूरकर शिवाजी पेठ, कोल्हापूर ९९२११९०३६४ |
| ३. | चैतन्य --- | कोकणस्थ | १२/५/९५ ५.८ | अत्री, कन्या हस्त, ४ थे आद्य, देव | B.E. Civil | स्वत:चा व्यवसाय | वा.प्रा. ४.८० लाख | गजानन फडके माधवनगर रोड, सांगली ८१४९२५३८२३ |
| ४. | प्रथमेश --- | देशस्थ | २/५/९६ ५.१० | भारद्वाज, तुळ चित्रा, ४ थे मध्य, राक्षस | M.A. (Psychology) | सोलापूर येथे नोकरी | वा.प्रा. २.५ लाख | दत्ता भालचंद्र कुलकर्णी विजापूर रोड, कोल्हापूर. ९४२००९०६९२ |
| ५. | प्रणव --- | देशस्थ | २३/७/९२ ५.४ | भारद्वाज, मेष अश्विनी, ३ रे आद्य, देव | B.E. Auto Graphic Design | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा. ४.६८ लाख | विवेक रामकृष्ण कर्नाटकी कोल्हापूर ९९२२३१३४०९ |
| ६. | प्रथमेश --- | देशस्थ | ८/१०/९३ ५.६ | भारद्वाज, मिथुन आर्द्रा, ३ रे आद्य, मनुष्य | B.Com. LLB, LLM MBA | स्वत:चा व्यवसाय कोल्हापूर | वा.प्रा. ९-१० लाख | उदय वासुदेव राजोपाध्ये राममंगल कार्यालयजवळ, कोल्हापूर. ९४२२५८९८९६ |
| ७. | शशांक --- | कोकणस्थ | २१/९/९१ ५.८ | शांडिल्य, कुंभ धनिष्ठा, ३ रे मध्य, राक्षस | B.Com. | कोल्हापूर येथे नोकरी | वा.प्रा. ३.२५ लाख | महेश बा. सहस्रबुद्धे कसबा बावडा, कोल्हापूर ७५८८१८०५१८ |
| ८. | स्वरूप O +ve | देशस्थ | ३/१/२००० ६.२ | वत्स, वृश्चिक अनुराधा, २ रे मध्य, देव | B.E. Mech. | हिंजवडी पुणे येथे नोकरी | वा.प्रा. ६ लाख | दिनकर विनायक पावशे कसबा बावडा, कोल्हापूर ९४२१४००८३६ |
| ९. | नीरज --- | देशस्थ | २/६/९४ ५.८ | गौतम, कुंभ पू.भाद्र, तिसरे आद्य, मनुष्य | B.E. Mech. | लोणेरे रायगड येथे | वा.प्रा. १२ लाख | प्रकाश पं. कुलकर्णी टाकाळा, कोल्हापूर ८००७६७११९७ |
| १०. | कौशिक O +ve | कोकणस्थ | ६/१/२००० --- | कौशिक, धनू पूर्वाषाढा, प्रथम मध्य, मनुष्य | B.E. Electrical | व्यवसाय | वा.प्रा. ६ लाख | मिलींद मधुकर खरे विश्राम बाग, सांगली. ९८८११४३५२२ |

**डॉ. अनिरुद्ध श्रीकांत वैद्य (देशस्थ ऋ.) A +ve**
**जन्मतारीख :** ९/६/१९८८ **उंची :** ५.८ फूट
**शिक्षण :** M.B.B.S. DCH **वा.प्रा. :** 15 ते 20 लाख
**नोकरी /व्यवसाय :** उत्तराखंड येथे प्रायव्हेट हॉस्पिटलमध्ये (सौम्य मंगळ आहे) **अपेक्षा :** अनुरूप
**पत्ता : श्री. श्रीकांत वैद्य,** मुरारजी पेठ, सोलापूर.
मोबा. 9423590566, 9922437135

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| अत्री | मीन | उ.भाद्रपदा | चौथे | मध्य | मनुष्य |

**सौरभ अमित गाडगीळ (कोकणस्थ) AB +ve**
**जन्मतारीख :** ८/११/१९९५ **उंची :** ५.४
**शिक्षण :** B.C.A., MBA **नोकरी :** IDFC First Bank
**वा. प्रा. :** 5 लाख (सांगली येथे)
**अपेक्षा :** मनमिळावू, अनुरूप
**पत्ता : श्री. अजित शामराव गाडगीळ**
जोशी गल्ली, गावभाग सांगली,
मोबा. 9552520494, 9011036426

| गोत्र | रास | नक्षत्र | चरण | नाडी | गण |
|---|---|---|---|---|---|
| गार्ग्य | मेष | कृतिका | प्रथम | अंत्य | राक्षस |

# नवस्नेह दिवाळी अंक २०२६ साठी आपल्या संस्थेची जाहिरात द्या !

सन्माननीय महोदय,

कोल्हापूर चित्पावन संघाचे नवस्नेह मासिक अल्पावधीतच लोकप्रिय झाले आहे. नामवंतांच्या साहित्याने नटलेला, विविध अंगांनी सजलेला, संग्राह्य ठेवावा असा हा नवस्नेह दिवाळी अंक ऐन दिवाळीत आपल्या भेटीस येत आहे. जगभरातील कोणालाही पाहता यावा यासाठी आपल्या संस्थेच्या वेबसाईटवर देखील हा अंक प्रदर्शित करण्यात येणार आहे. या आपल्या दिवाळी अंकात तुमच्या उद्योगाची जाहिरात असावी असे आम्हाला मनापासून वाटते. आपणही यास नक्की सहकार्य कराल याची खात्री आहेच. आपल्यासारख्या दानशूर व्यक्तींमुळेच या अंकाला खऱ्या अर्थाने अर्थ प्राप्त होत आहे. या पत्राद्वारे आम्ही आपल्याला विनंती करत आहोत की, आपली जाहिरात लवकरात लवकर पाठवून मोलाचे सहकार्य करावे. अंकाची तांत्रिक माहिती खालीलप्रमाणे –

- अंकाचा आकार : 1/8 क्राऊन (7" x 10")
- मजकूर पाने : अंदाजे 150
- जाहिरातीचे दर :
- कव्हर पान 2 व 3 रंगीत : प्रत्येकी रु. 10 हजार फक्त
- पूर्ण रंगीत पान : रु. 7,000/-
- अर्धे रंगीत पान : रु. 5,000/-
- पाव रंगीत पान : रु. 3,000/-
- कृष्णधवल पूर्ण पान : रु. 2,000/-
- कृष्णधवल अर्धे पान : रु. 1,500/-
- कृष्णधवल पाव पान : रु. 1,000/-
- कृष्णधवल व्हिजिटिंग कार्ड साईज : रु. 500/-
- सदिच्छा जाहिरात : रु. 200/-

आपली जाहिरात संस्थेच्या ई-मेलवर अथवा व्हॉटस्ॲपवर पाठवू शकता. लवकरात लवकर म्हणजे शनिवार, दि. 10 ऑक्टोबर 2026 पर्यंत मिळेल या बेताने पाठवावी.

कळावे, लोभ आहेच, तो वृद्धिंगत व्हावा ही विनंती.

आपले स्नेहांकित,

प्रसाद भिडे (उपाध्यक्ष) मकरंद करंदीकर (अध्यक्ष)

केदार जोशी (कार्यवाह)

आणि सर्व संचालक मंडळ सदस्य

# हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ आणि पंचरत्न वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने ब्राह्मण वधूवर विशेषांक प्रसिद्ध होणार !

हीरकमहोत्सवी कोल्हापूर चित्पावन संघ आणि महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक आणि मध्य प्रदेश या राज्यात अनेक शाखांद्वारे लोकप्रिय असलेले वधूवर व पालकांच्या विश्वासास पात्र ठरलेले पंचरत्न वधूवर सूचक केंद्र, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने दिवाळीच्या मुहूर्तावर वधूवर विशेषांक प्रसिद्ध होत आहे. हा अंक पुस्तक स्वरूपात नोव्हेंबर महिन्यात प्रसिद्ध होईल. अंदाजे शेकडो स्थळांबरोबरच विवाह विषयक अत्यंत उपयुक्त माहितीसह प्रसिद्ध होणारा हा संग्राह्य विशेषांक आहे. यामध्ये शेकडो स्थळांबरोबरच वधूवरांची माहिती त्यांच्या संपर्क फोनसहित देणार आहोत. ब्राह्मण पोटशाखेतील देशस्थ, कोकणस्थ, कऱ्हाडे, सारस्वत, सीकेपी तसेच प्रथमवर, घटस्फोटीत, सापत्य, विधवा, विधूर अशा सर्व स्थळांची माहिती या अंकात मिळू शकणार आहे.

या विशेषांकात ज्या ब्राह्मण वधूवरांना आपली माहिती फोटोसह प्रसिद्ध करावयाची आहे, त्यांनी विजयादशमी, मंगळवार, दि. 20 ऑक्टोबर 2026 पर्यंत त्यासाठी नाव नोंदणी करावी. कोल्हापूर चित्पावन संघ कार्यालय, 428, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर - 12, फोन नं. 0231-2546225, 2991673 आणि मोबाईल नं. 7620546225 किंवा पंचरत्नच्या पाच राज्यातील कोणत्याही शाखेमध्ये प्रत्यक्ष संपर्क साधून आजच आपली नोंदणी करावी. नोंदणी शुल्क रु. 500/- फक्त. पंचरत्नचा फोन क्र. 0231 - 2621001 आणि मोबाईल क्र. 9881291863 आहे. अंकाची किंमत रु. 200/- राहील. (कुरिअर चार्जेस वेगळे)

वधूवर अंकात नाव नोंदणी करताना शाखांमध्ये जाऊन विहित नमून्यातील फॉर्म भरावा. फोटो देताना अलिकडच्या काळातील फोटो द्यावा. फोटोला पीन मारू नये. फोटोमागे पूर्ण नाव लिहावे व फोटो चौकोनात चिकटवावा.

- ई-मेलवर नोंदणी करणाऱ्यांना - ज्या शहरात पंचरत्नची शाखा नाही त्या वधूवरांनी अंकातील फॉर्म सुवाच्च अक्षरात भरून स्कॅन करून पाठवावा. स्कॅन केलेला फॉर्म व रंगीत फोटो panchratnakop@gmail.com या पंचरत्नच्या ई-मेलवर स्वतंत्ररित्या पाठवावा. अथवा फॉर्म आणि फोटो 9881291863 या व्हॉटस्अप नंबरवर

पुढील मजकूर पृष्ठ 24 वर पहा

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027

SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.




- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

Quality Approvals
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




HEAD OFFICE :
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

FACTORY :
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

E-mail : info@shogini.com

Visit us at : www.shogini.com

प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.